नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

या अंकांत

विसाव्या शतकांतील बुद्धिवाद	–नी. र. वऱ्हाडपांडे
कवितेमधील रम्यता	–भास्कर कविमंडन
पुस्तकपरीक्षण	–श्री. अप्रबुद्ध

शिवाय ग्रंथसमालोचन, संघवार्ता वगैरे.

वर्ष १२ संपादक : जून १९५७
अंक ३ पां. कृ. सावळापूरकर किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

शोकसमाचार

गोंदिया येथील विदर्भ साहित्य संघ शाखेचे एक प्रमुख कार्य-कर्ते श्री. नारायण गणेश डबीर, यांचें २२ मे रोजीं सकाळीं ५॥ वाजतां विद्युत्प्रवाहस्पर्शाच्या अपघाताने अकालिक व आकस्मिक अवसान झालें हें लिहितांना आम्हाला अपरिमित शोक होत आहे. श्री. डबीर हे गोंदिया येथील उत्तम वकील व कार्यकर्ते होते. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारीमंडळाचे ते माजी सदस्य असून गोंदिया विभागांत संघकार्याचा प्रसार व प्रचार व्हावा यासाठी त्यांनी फार परिश्रम घेतले होते. गेल्या जानेवारींत गोंदिया येथे भरलेलें विदर्भ साहित्य संमेलनाचें अधिवेशन यशस्वी करण्यांत त्यांचा फार मोठा वाटा होता. नुकत्याच भवभूति–स्मारकमंदिराचा कोनशिला समारंभ झाला तेंहि त्यांच्याच परिश्रमाचें फळ होय 'युगवाणी' श्री. डबीर यांच्या स्मृतीस श्रद्धांजलि अर्पण करीत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखांत सहभागी असल्याचें जाहीर करीत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. त्र्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष १२ वें अंक ३

जून १९५७

संपादकीय

मराठी साहित्य संमेलनाची फलश्रुति

गेल्या महिन्यांत औरंगाबाद येथे भरलेलें मराठी साहित्य संमेलनाचें एकोणचाळिसावें अधिवेशन संकल्पाप्रमाणे पार पडलें. प्रस्तुत अधिवेशनास येणाऱ्या प्रतिनिधींच्या जेवणाखाणासंबंधी अत्यंत गैरव्यवस्था होती असा बोभाटा वर्तमानपत्रांतून झालेला आहे. साहित्य संमेलनांतील ही असाहित्यिक बाब सोडली तरी अन्य दृष्टीने या संमेलनाची फलश्रुति काय, असा प्रश्न शिल्लक उरतो. गेल्या कांही वर्षांत भाषिक प्रश्न हा राजकारणाचा विषय झाल्यापासून साहित्य संमेलनासारख्या शुद्ध सांस्कृतिक संस्थांवर देखील राजकारणाची व राजकारणी पुरुषांची दाट छाया पडूं लागली आहे. ही अवस्था साहित्याच्या हिताला किती उपकारक आहे याचा गंभीर विचार झाला पाहिजे.

साहित्यसंस्थांचें एकसूत्रीकरण

या प्रश्नावर बरेंच रण माजेल अशी अपेक्षा होती. 'युगवाणी'च्या एप्रिलच्या अंकांत या प्रश्नासंबंधी विचारार्थ कांही मुद्दे आम्ही सादरहि केले होते. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नानेच सर्व उत्साह खाऊन टाकल्यामुळे वरील प्रश्नाचा विचार करावयाला एक समिति फक्त नेमली गेली. पुढील संमेलनापर्यंत या समितीने आपलें प्रतिवृत्त सादर करावयाचें आहे.

वर्गसंघटना की लोकसंघटना ?

साहित्य संस्था या वर्गसंघटना आहेत की लोकसंघटना आहेत ? उभयविध असतील तर त्यांचें स्वरूप कसें असावें ? अलिकडे साहित्य संस्थांवर राजकीय पक्षांचें जें सावट पडलेलें असतें या संकटाचा परिहार कसा करावा ? इत्यादि मूलगामी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्नांवर मराठवाडा साहित्य परिषदेच्या 'प्रतिष्ठान' मासिकाने एक परिसंवाद योजला होता. अपेक्षा अशी होती की या महत्त्वाच्या प्रश्नावर देखील साहित्य संमेलनांत कांही चर्चा होईल. परंतु तसें कांही एक घडून आलें नाही. परंतु केव्हा तरी याहि प्रश्नावर संमेलनाने आपलें अधिकृत मत दिलें पाहिजे.

महाराष्ट्राची संयुक्तता

औरंगाबाद संमेलनांत, स्वागताध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य पुणें-मुंबईकर महत्त्वाचे पाहुणे यांचीं जीं भाषणें झालीं त्यांत महाराष्ट्र आणि विदर्भ; महाराष्ट्र आणि मराठवाडा, महाराष्ट्र आणि नागपूर अशा प्रकारचे प्रयोग सरसहा येत असत. याचा अर्थ असा आहे की यांच्या मतें विदर्भ किंवा मराठवाडा हे विभाग खऱ्या महाराष्ट्राबाहेर आहेत. 'महाराष्ट्र' या नांवाने मुंबई-पुण्याजवळील फक्त कांही जिल्हेच येतात, असा एकंदर त्या भाषणांतला सूर दिसला. महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा हे तीन तुकडे एकत्रित सांधले म्हणूनच त्याला 'संयुक्त' महाराष्ट्र म्हणावयाचें; एरव्हीं संपूर्ण मराठीभाषिक प्रदेश हा एक महाराष्टच असेल तर 'संयुक्त' या विशेषणाचें प्रयोजनच काय? बरें हे तीन तुकडे एकत्रित सांधल्यानंतर झालेल्या प्रदेशाला संयुक्त महाराष्ट्र या ऐवजीं संयुक्त विदर्भ किंवा संयुक्त मराठवाडा असें कां म्हणूं नये, हें सांगतां येईल काय? अलिकडे प्रत्येक शाळांत बहुधा मुलें-मुली एकत्र शिक्षण घेत असतात; पण असें असूनहि 'प्राधान्येन व्यपदेश:' या न्यायाने विशिष्ट शाळा मुलांची किंवा मुलींची आहे हें ठरवावें लागतें. आज जे गुजराथी-मराठी द्वैभाषिक राज्य अस्तित्वांत आलें आहे तें सांधेजोडीमुळे नि:संशय 'संयुक्त' स्वरूपाचें झालें आहे. व त्या राज्यांत मराठी भाषिक प्रदेशाचें क्षेत्र 'विशाल' असल्यामुळे वरील न्यायाने याच राज्याला 'संयुक्त महाराष्ट्र' असें म्हणतां येईल! सारांश 'महाराष्ट्र' शब्दाचा उपयोग मनांत आकुंचित कल्पना ठेवून करणें व 'संयुक्त' या विशेषाने ती कल्पना आणखी दृढ करणें याविरुद्ध आमचा आक्षेप आहे हें सहज कळेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विसाव्या शतकांतील बुद्धिवाद

श्री. नी. र. वऱ्हाडपांडे

मध्ययुगामध्ये साधारणतः सर्वच देशांमध्ये बुद्धिवादाची पीछेहाट होऊन अज्ञानाचें व गूढवादाचें साम्राज्य पसरलें होतें. यानंतर गॅलिलिओने प्रयोगसिद्ध अवलोकनाची दीक्षा युरोपला दिली. तेव्हापासून बुद्धिवादाने जीवनाचे एकामागून एक प्रदेश काबीज केले व त्यांतून अज्ञान आणि त्यांचा पोशिंदा गूढवाद यांचें उच्चाटन केलें. बुद्धिवादाचा हा दिग्विजय तेव्हापासून अखंड सुरूच आहे.

असें असून देखील बुद्धिवादाला बुजणारे कांही लेखक 'बुद्धिवाद आता जुना झाला' आधुनिक विज्ञानाने तो खोटा ठरवला आहे असें विधान करतात. बुद्धिवादाचा एखादा स्वयंकल्पित अर्थ दिल्याशिवाय या विधानाचा नीट अर्थ लागूं शकत नाही. कारण विज्ञानाच्या सत्यान्वेषणाच्या तंत्रालाच बुद्धिवाद म्हणतात. विज्ञानाने बुद्धिवाद खोटा पाडला असें म्हणणें, बुद्धिवादाने बुद्धिवाद खोटा पाडला असें म्हणण्यासारखेंच आहे.

पण ' बुद्धिवादाने बुद्धिवाद खोटा पाडला असें म्हणण्यांत काय चूक आहे ? जीवनाच्या अनेक क्षेत्रांत व अनेक प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी बुद्धिवाद निरुपयोगी आहे असें बुद्धिवादानेच कळूं शकेल. बुद्धिवाद हा शब्द विज्ञानवाद या अर्थी वापरला तरी अमुक अमुक क्षेत्र विज्ञानाला अगम्य आहे असें विज्ञानानेच ठरवणें अशक्य नाही ' असें प्रतिपादलें जाऊं शकतें. म्हणून बुद्धिवादाला आता उतरती कळा लागली आहे हें गूढवाद्यांचें मत कितपत खरें आहे हें पाहण्यासाठी अलीकडे विज्ञानाचा संकोच होऊं लागला आहे की काय, याचा विचार करणें अवश्यक आहे. ऋष्यमूक पर्वतावर येशील तर मरण पावशील असा वालीला शाप असल्यामुळे त्याने ऋष्यमूक पर्वत वर्ज्य केला, त्याचप्रमाणे अमुक क्षेत्रांत शिरावयाचें नाही व तीं क्षेत्रें गूढवादासाठी राखून ठेवायचीं असें आधुनिक विज्ञानाने ठरविलें आहे असा गूढवाद्यांच्या प्रचारामुळे कांही लोकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे. तो दूर केला पाहिजे.

विज्ञानाची प्रचंड झेप

विसाव्या शतकांतल्या विज्ञानाच्या प्रगतीचा इतिहास जर नजरेखालून घातला तर आधुनिक काळांत विज्ञानाची पीछेहाट तर मुळीच झालेली नाही उलट गूढवाद्यांनी खास आपले म्हणून मानलेले प्रांतहि विज्ञानाने भराभर काबीज केले आहेत हें स्पष्ट दिसून येतें. जड सृष्टीच्या बाबतींत विज्ञानाचें मत प्रमाण असलें तरी मानवी मन, समाजधारणा नि नैतिक व सौन्दर्यविषयक मूल्यें हीं गूढवादाचीं राखीव क्षेत्रें आहेत. त्यांच्या दारावर ' विज्ञानास मज्जाव ' अशी पाटी साक्षात् ईश्वराने लावून ठेवली आहे असें पूर्वी मानलें जात असे. पण आज याहि क्षेत्रांत विज्ञानाचें प्राबल्य स्थापित झालें आहे व गूढवादाला हा शेवटला थारा देखील सोडावा लागणार आहे.

मनाच्या वैज्ञानिक अभ्यासा । १९ व्या शतकांतच सुरवात झाली, पण विसाव्या शतकांत या प्रयत्नांना इतका बहर आला की ऑक्सफर्ड व केम्ब्रिज यासारख्या जगन्मान्य विद्यापीठांत देखील मानसशास्त्राची एक स्वतंत्र शाखा स्थापली गेली. पंचमहाभूतांचे गुणधर्म समजून घेण्यासाठी वैज्ञानिक ज्या पद्धतींचा अवलम्ब करतात त्याच पद्धतीचा अवलम्ब आधुनिक मनोविज्ञानांत मनाचे गुणधर्म समजून घेण्या-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साठी देखील केला जातो. ही पद्धति म्हणजे प्रयोगसिद्ध अवलोकनाची पद्धति. Man is a rational animal. मानव हा बुद्धिमान प्राणी आहे, इतर प्राण्यांत बुद्धि हा गुण नाही, व ही बुद्धि म्हणजे कांही-तरी दैवी व गूढ वस्तु आहे असें पूर्वी समजलें जात असे. पण आधुनिक मानसशास्त्राने 'बुद्धि' या शब्दाची निश्चित व्याख्या करून तिचें मापन करण्याची युक्ति शोधून काढली आहे. बुद्धिविषयीच्या या संशोधनांतून फक्त मानवालाच बुद्धि आहे हें मत खोटें ठरलें आहे. चिपॅन्झी जातीचीं माकडें एका स्टुला-वर दुसरा स्टूल ठेवतात व त्यावर चढून उंच टांगलेलीं केळीं हस्तगत करतात असें प्रयोगान्तीं आढळून आलें आहे. त्याचप्रमाणें बुद्धि ही एखादी दैवी वा गूढ शक्ति नसून ती मेन्दूच्या गुणधर्मावर अवलम्बून आहे हें अधिकाधिक स्पष्ट होत चाललें आहे. उन्दरावर शस्त्र-क्रिया करून त्याच्या मेन्दूचा एक भाग कापला तर त्याची बुद्धि कमी होते. मेन्दूचा जेवढा भाग जास्त कापावा तेवढीच बुद्धि जास्त पङ्गु होत जाते. क्रेटि-निझमसारख्या रोगांनी बुद्धि खुरटते व शस्त्रक्रिया करून तो रोग बरा केला की ती पुन: चांगलें काम करूं लागते.

बुद्धीप्रमाणेच भावनांचेंही मापन करण्याची युक्ति मनोविज्ञानाने काढली आहे. मनुष्य भावनावश झाला म्हणजे त्याची नाडी व हृदय यांचें स्पन्दन, श्वासोच्छ्वास, रुधिराभिसरण, स्वेदोद्रेक इत्यादि अनेक गोष्टींवर त्यांचा परिणाम दिसून येतो. या सर्वांचें मापन आधुनिक मनोविज्ञानाला करतां येतें. एवढेंच नव्हे तर निरनिराळ्या मन:स्थितींत मेन्दूंत संचार करणाऱ्या विद्युत्प्रवाहावर काय परिणाम होतो याचें चित्रण Electroencephelograp च्या साहाय्याने करतां येतें.

आपण मनांतले विचार बोलून दाखवितों तेव्हा आपल्या गळ्यांतल्या ध्वनिरज्जूंची हालचाल होते, त्याचप्रमाणें आपण मनांतल्या मनांत विचार करतों तेव्हा देखीऌ होते. ही हालचाल कशी होते तें नोन्दून घेणारें एक यन्त्र आहे. तें गळ्याला लावलें म्हणजे ध्वनिरज्जूंच्या हालचालीचा नकाशा त्यावर काढला जातो. या नकाशावरून माणसाच्या मनांत काय विचार चालले होते हें अजून ओळखतां येत नाही. पण या नकाशाची लिपि वाचण्याची कला लवकरच निर्माण होईल व दुसऱ्याच्या मनांतले विचार देखील आपल्याला त्याने न सांगतां कळूं शकतील. मनोविज्ञानाची अभूत-पूर्व प्रगति पाहतां विसाव्या शतकांत बुद्धिवादाची पीछेहाट होत चालली आहे असें कोण म्हणूं शकेल ?

मनोविश्लेपण आणि अतीतमानसशास्त्र (Parapsychology)

मानसशास्त्राच्या या प्रगतीनेच बुद्धिवाद खोटा पाडला आहे कारण मानवाचे व्यवहार बुद्धीच्या प्रेरणेने होत नाहीत असा मनोविश्लेषणाचा शोध आहे असें कांही लोक म्हणतात. या म्हणण्यावर हसावें कीं रडावें हेंच कळत नाही ! मानवाचे व्यवहार बुद्धीच्या प्रेरणने होत नाहीत हें कळायला या आक्षेपकांना मनोविश्लेषणाची जरूर कां भासावी कळत नाही ! राग आणि द्वेष हे मानवाच्या प्रवृत्तीचें मूळ आहे असें मनोविश्लेषणशास्त्र जन्माला यायच्या हजारों वर्षें आधी गीतेनेच सांगितलें आहे. मानव भूक लागते म्हणून जेवतो व तहान लागते म्हणून पाणी पितो, त्याने जेवावें व पाणी प्यावें असें तर्कशास्त्राने सिद्ध केलें आहे म्हणून तो असें करतो असें नाही, हें साधें सत्य कळायला फ्राइडकडे धाव घ्यायची जरूर नाही.

बुद्धि ही मानवाची प्रेरकशक्ति नसली तरी तेवढ्याने बुद्धिवाद खोटा पडत नाही. गूढवाद्यांना आम्ही विचारतों "बुद्धि ही मानवाची प्रेरकशक्ति नाही हें आपल्याला बुद्धिवादाने कळतें की गूढवादाने"? बुद्धीचें कार्यक्षेत्र काय याचें ज्ञान बुद्धिवादाशिवाय होऊं शकत नाहीं. तसेंच बुद्धि ही प्रेरकशक्ति नसली तरी नियामक शक्ति आहे. मोटरीच्या चाकांना दिशा देणारें सुकाणू व तिचा गतिरोध करणारे दाव (brakes) या दोहोंचे कार्य जीवनांत बुद्धि करते. भूक बुद्धीमुळे निर्माण होत नसली तरी शेती करणें हा भुकेची व्यवस्था करण्याचा उत्तम मार्ग आहे हें बुद्धीनेंच कळतें. त्याचप्रमाणें कितीहि तहान लागली तरी कॉलऱ्याचे जन्तु असलेलें पाणी पिऊं नये हें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बुद्धीशिवाय कळूं शकत नाही. बुद्धीने निर्माण न केलेल्या सुप्त वा असुप्त अशा कितीहि प्रेरणा मनोविश्लेषणाने उजेडांत आणल्या तरीं तेवढ्याने बुद्धीचें महत्त्व कमी होऊं शकत नाहीं.

आधुनिक मानसशास्त्राने अतीन्द्रिय प्रत्यक्ष, समाधि वगैरे गोष्टींचें अस्तित्व सिद्ध करून बुद्धिवाद खोटा पाटला आहे; असा प्रचार कधीकधी करण्यांत येतो. अतीन्द्रिय प्रत्यक्ष म्हणजे ज्या वस्तूंचा इन्द्रियांशी सम्बन्ध झालेला नाही त्या वस्तूंचें ज्ञान होणें. उदा० भिंतीच्या आड असलेल्या फळचावर काय लिहिलें आहे हें वाचतां येणें. अशा तऱ्हेचें ज्ञान होऊं शकतें असें कांही मानसशास्त्रज्ञांना आढळून आलें आहे. पण या बाबतींत अजून मानसशास्त्रज्ञांत एकमत नसल्यामुळें अतीन्द्रिय प्रत्यक्षाचें अस्तित्व सिद्ध झालें आहे असें मानतां येत नाही. दुसरें असें की अतीन्द्रिय प्रत्यक्ष सिद्ध झालें तरी त्यामुळे बुद्धिवादाला बाध येत नाहीं. अतीन्द्रिय प्रत्यक्षाचें अस्तित्व प्रयोगसिद्ध अवलोकनाच्या आधारेंच सिद्ध होणार ना ? मग त्यामुळे बुद्धिवाद कसा खोटा पडणार ? प्रयोगसिद्ध अवलोकनाच्या आधारावर सिद्धान्त बसवणें यालाच बुद्धिवाद म्हणतात. हजारों मैल दूर असलेल्या व्यक्तीचें भाषण ध्वनिक्षेपकाच्या साहाय्याने ऐकूं येतें व दूर देशीच्या व्यक्तीचें दर्शन टेलीव्हिजनच्या साहाय्याने होऊं शकतें यामुळे जर बुद्धिवाद खोटा पडत नाही तर दुसऱ्या खोलींतल्या फळचावर काय लिहिलें आहे तें या खोलींत बसून वाचतां येतें म्हणून बुद्धिवाद खोटा कां पडावा ?

आधुनिक मानसशास्त्र आणि समाधि

तसेंच आधुनिक मानसशास्त्राने समाधीचें अस्तित्व सिद्ध केलें आहे, म्हणजे काय केलें आहे याचा विचार केला की गूढवाद्यांच्या प्रचाराचा फोलपणा उघड होतो. ज्या स्थितींत निरतिशय आनन्दाखेरीज दुसऱ्या कशाचाहि अनुभव येत नाहीं अशी स्थिति सम्भवते व तिचा आपल्याला अनुभव आला आहे असें विल्यम जेम्ससारखे मानसशास्त्रज्ञ म्हणतात. निरतिशय आनन्दाशिवाय जिच्यांत कशाचाच अनुभव येत नाही अशी स्थिति दारू प्याल्याने किंवा अफू खाल्याने देखील येते. मग समाधींतच काय विशेष आहे असें विचारलें तर कांही गूढवादी समाधिस्थितींत मेन्दू जोमाने काम करतो, उलट अफूच्या गुंगींत तो सुप्तावस्थेंत असतो असें उत्तर देतात. समाधिस्थितींत असलेल्या व्यक्तींच्या मेन्दूंतील विद्युत्प्रवाहाचें जें चित्रण Electroencephelograph वर मिळतें त्याच्या आधारें हें विधान केलें जातें. अशा चित्रांवरून मेन्दू सुप्तावस्थेंत आहे की जागृतावस्थेंत आहे हें ओळखतां येतें.

निरतिशय आनंदाची पण अफूच्या गुंगीहून वेगळी अशी एक स्थिति आहे असें मानसशास्त्रीय प्रयोगांनी सिद्ध झालें आहे असें मानलें तरी त्यावरून बुद्धिवाद खोटा पडतो काय ? मुळीच नाही. बुद्धिवाद खोटा पडायला समाधीचें बुद्धिनिरपेक्ष असें ज्ञानात्मक मूल्य सिद्ध झालें पाहिजे. तें अजून मुळीच सिद्ध झालेलें नाही.

ज्ञानात्मक मूल्य म्हणजे काय याचें थोडें स्पष्टीकरण केलें पाहिजे. दुर्बिण व सूक्ष्मदर्शक यन्त्र यांच्या साहाय्याने आपल्याला कांही वस्तू दिसतात. त्या साध्या डोळ्यांनी दिसत नाहीत पण तरी त्या खऱ्या आहेत याचा पडताळा पाहतां येतो. दुर्बिणीने दहा मैलावरील डोंगरावर एक देऊळ दिसलें तर दहा मैल चालत जाऊन त्या डोंगरावर गेल्यास तें देऊळ साध्या डोळ्यांनाहि दिसूं शकतें. म्हणून दुर्बिणीच्या साहाय्यानें झालेलें ज्ञान आपण खरें मानतो. त्याचप्रमाणें सूक्ष्मदर्शक यन्त्राने "अ" प्याल्यांतील पाण्यांत कॉलऱ्याचा जन्तू दिसला व "ब" प्याल्यांतील पाण्यांत तो दिसला नाही तर "अ" प्याल्यांतील पाणी प्याल्याने बहुतकरून कॉलरा होईल व "ब" प्याल्यांतील पाणी प्याल्याने होणार नाही असें आपण निश्चितपणें म्हणूं शकतो. कॉलऱ्याचा जन्तु साध्या डोळ्यांना दिसला नाही तरी कॉलऱ्याचीं चिन्हें साध्या डोळ्यांना दिसूं शकतात म्हणून सूक्ष्मदर्शक यन्त्राच्या साहाय्याने होणारें ज्ञान आपण खरें मानतो. अर्थात् दुर्बीण व सूक्ष्मदर्शक या यन्त्रांना खरें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. म्हणजेच त्यांना ज्ञानात्मक मूल्य आहे. समाधीच्या ठायीं असें ज्ञानात्मक मूल्य आहे काय ?

समाधि लागली म्हणजे माणूस सर्वज्ञ होतो असें एक मत प्रचलित आहे. 'यास्मिन् ज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति' 'ज्या ज्ञानाने सर्व विश्वाचें ज्ञान होतें' असें ब्रह्मज्ञानाचें वर्णन केलें गेलें आहे. हें जर खरें असेल तर समाधिसिद्ध पुरुष सर्वज्ञ असले पाहिजेत. म्हणजे ज्याला समाधि लागते अशा पुरुषाला कोणतेंहि गणित विचारलें तरी सोडवतां आलें पाहिजे, जगांतल्या कोणत्याहि भाषेंतल्या कोणत्याहि वाक्याचा अर्थ सांगतां आला पाहिजे, कोणत्याहि पुस्तकांतल्या कोणत्याहि पानावर काय लिहिलें आहे हें सांगतां आलें पाहिजे. समाधि लागल्याने असा कांही चमत्कार होतो असें कुणी म्हणत नाही. मग समाधीमुळे सगळें कांही जाणलें जातें याचा अर्थ काय ?

अध्यात्मवादी याचा अर्थ असा करतात की समाधींत होणाऱ्या ज्ञानापुढे बाकीचें सर्व ज्ञान तुच्छ आहे. किंबहुना विज्ञानाचें किंवा गणिताचें ज्ञान हें ज्ञान नव्हेच. ही सर्व अविद्या आहे. विज्ञान व गणित यांचें ज्ञान तुच्छ व हीन दर्जाचें आहे याची जाणीव समाधींत होते. समाधींत जें ज्ञान होतें तें खरें महत्त्वाचें ज्ञान असतें. समाधिसिद्ध पुरुषाला भौतिकी (Physics) व गणित आपोआप येत नसलें तरी त्यांची व्यर्थता कळते, म्हणून समाधीनें सर्वज्ञता येते असें आम्ही म्हणतों.

अध्यात्मवाद्यांचें हें उत्तर फारच मासलेवाईक आहे. गणित व भौतिकी यांचें ज्ञान तुच्छ आहे ही जाणीव व्हायला समाधि लागायची काय जरूर आहे ? गणिताचीं पुस्तकें वाहून नेणारा उंट, व भौतिकीचीं पुस्तकें कोरून खाणारी कसर यांना देखील गणित व भौतिकी अगदी तुच्छ आहेत अशी जाणीव असते. किंवा या बाबतींत समाधिसिद्ध पुरुषापेक्षाहि त्यांची 'प्रगति' एक पाऊल पुढेच असते कारण गणितासारखी कांही भानगड अस्तित्वांत आहे याचीच मुळी त्यांना दखल नसते. 'सर्वज्ञता म्हणजे ज्ञानाबद्दल तुच्छताबुद्धि' ही व्याख्या फक्त अध्यात्मवाद्यांच्या विचार (?) पद्धतींतच बसूं शकते.

समाधीचें ज्ञानमूल्य

बरें, समाधीनें सर्वज्ञता अंगीं येत नसली तरी दुर्बिण किंवा सूक्ष्मदर्शक यन्त्र यांच्या साहाय्याने जसें साध्या इन्द्रियांना न होणारें खरें ज्ञान होतें तसें एखादें ज्ञान होतें की काय ? होतें असें सर्व अध्यात्मवादी म्हणतात; पण नक्की कोणतें ज्ञान होतें याबद्दल त्यांच्यांत मुळीच मतैक्य नाही. गूढवादी वेदान्त्यांना 'काल मिथ्या आहे' असें ज्ञान समाधींत होतें, तर याच्या अगदी उलट बर्गसाँ नांवाच्या गूढवादी तत्त्वज्ञानाला 'काल हेंच एकमेव सत्य आहे' असें ज्ञान गूढानुभूतींत होत असे. बरें वादासाठी वेदान्त्यांची समाधि 'खरी' व बर्गसाँची खोटी असें गृहीत धरूं. (असें गृहीत धरायला वेदान्त्यांजवळ कांही प्रमाण आहे काय ?) दुर्बिणीनें दिसणारा पदार्थ खरोखरच अस्तित्वांत असतो याची प्रचीति जशी साध्या डोळ्यांना घेतां येते, किंवा सूक्ष्मदर्शकाने दिसणारा कॉलऱ्याचा जंतु खरा असता हें जसें कॉलऱ्यावरून सिद्ध होतें, त्याप्रमाणे समाधींत होणारें 'काल मिथ्या आहे' हें ज्ञान खरें मानायला कांही प्रमाण आहे काय ?

असें प्रमाण मुळीच नाही. उलट कालाच्या सत्यतेची प्रतीति सर्वच व्यवहारांत येते. 'काल मिथ्या आहे' असें ज्ञान जर समाधींत होत असेल तर समाधिस्थिति स्वप्नासारखीच भ्रांतिमय आहे असें अनुमान काढलें पाहिजे. शिवाय 'काल मिथ्या आहे' या वाक्याचा अर्थ तरी काय ? 'बाप मुलाच्या पूर्वी जन्माला येतो' असें म्हटलें काय किंवा 'मुलगा बापाच्या पूर्वी जन्माला येतो' असें म्हटलें काय सारखेंच असा कालाला मिथ्या मानण्याचा अर्थ होईल. किंवा "'ब' 'अ' च्या नंतर अस्तित्वांत येतो" अशासारखीं वाक्यें बोलणें काय किंवा 'गडडधुप्' असे निरर्थक आवाज काढणें काय सारखेंच असें काल मिथ्या मानल्याने मानावें लागेल ! हें मत समाधीच्या चांगलेंच अंगलट येणार आहे. कारण काल मिथ्या असेल तर समाधी लागायच्या पूर्वी होणारें ज्ञान व समाधींत होणारें ज्ञान यांत कांही फरकच मानतां येणार नाही, कारण पूर्वी व नंतर हे शब्दच मुळी निरर्थक ठरतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गूढानुभूतींत कसलेंहि ज्ञान होत नाही, एवढेंच नव्हे तर गूढानुभूतींत झालेलें 'ज्ञान' ज्या वाक्यांमध्ये ग्रथित केलेलें असतें तीं वाक्यें अर्थशून्य असतात असें आधुनिक अर्थमीमांसाशास्त्राच्या (Semantics) आधारें दाखवून देतां येतें. अर्थात् समाधीचें ज्ञानात्मक मूल्य शून्य असतें.

समाधीची क्षणिकता

बरें, ज्ञानात्मक मूल्य शून्य असलें तरी समाधीला कांही नैतिक मूल्य आहे की नाही ? म्हणजे ज्याला समाधि लागते तो पुरुष समाधि लावण्याचें सामर्थ्य अंगीं येण्यापूर्वी जेवढा नीतिमान होता त्यापेक्षा जास्त नीतिमान् होतो की काय ? त्याचप्रमाणे समाधिसिद्ध पुरुष समाधि लावूं न शकणाऱ्या तुम्हां आम्हांसारख्या लोकांपेक्षा जास्त नीतिमान् असतो काय ? या दोन्ही प्रश्नांचें 'होय' असें उत्तर देण्यासारखा पुरावा आधुनिक मानसशास्त्राला मुळीच सापडलेला नाही.

दुसऱ्यांना सुख देण्यांत सुख मानणें असें नीतिमत्तेचें थोडक्यांत लक्षण सांगतां येईल. हें लक्षण देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान करणारे देशभक्त, स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करतां असाध्य रोगांवर उपाय शोधून काढण्यासाठी अविरत संशोधन करणारे शास्त्रज्ञ व लोकप्रियता, वैभव इत्यादि मोहांना बळी न पडतां समाजसुधारणेसाठी आयुष्यभर झगडणारे आगरकरांसारखे सुधारक यांच्या जीवनाला जसें सर्वांशानें लागूं होतें तसें समाधि लावून बसणाऱ्या लोकांच्या जीवनाला मुळीच लागूं होत नाही.

समाधीनें जीवनाला विशालता येते हें मत किती खोटें आहे याचें प्रत्यन्तर नैषधीयचरित या महाकाव्याचा कर्ता श्रीहर्ष याच्या उदाहरणावरून येतें. तो म्हणतो:–

ताम्बूलद्वयमासनं च लभते यः कान्यकुब्जेश्वरात्
यः साक्षात्कुरुते समाधिषु परं ब्रह्म प्रमोदार्णवम्
यत्काव्यं मधुवर्षि धर्षितपरास्तर्केषु यस्योक्तयः
श्री श्रीहर्षकवेः कृतिः कृतिमुदे तस्याभ्युदीयादियम् ।

"कान्यकुब्ज देशचा राजा आसन व दोन विडे देऊन ज्याचा सन्मान करतो, ज्याला समाधींत **आनन्दसागर ब्रह्माचें प्रत्यक्ष दर्शन होतें,** ज्याचें काव्य मधुवर्षी व ज्याच्या तर्कोक्ति प्रतिपक्षाला निरुत्तर करणाऱ्या आहेत त्या श्रीहर्ष कवीची ही कृति श्रेष्ठांना आनन्द देत कीर्तिशाली होवो."

मला समाधि लावतां येते असें श्रीहर्ष स्वतःच सांगतो. अध्यात्मवाद्यांच्या मताप्रमाणे समाधींत अंतिम सत्याचें दर्शन होऊन बाकीचें सर्व ज्ञान व बाकीचीं सर्व सुखें तुच्छ वाटूं लागतात. पण हें श्रीहर्षाच्या बाबतींत खरें ठरलें काय ? मुळीच नाही. त्याला समाधींत होणाऱ्या ब्रह्माच्या दर्शनापेक्षा दोन विडे व आसन देणाऱ्या राजाचें दर्शन जास्त महनीय वाटत होतें. त्याचा उल्लेख त्याने समाधीच्याहि आधी केला आहे ! त्याचप्रमाणें साहित्यिक प्रतिभा व तर्कशास्त्रांतील नैपुण्य यांच्याबद्दल त्याला तुच्छता मुळीच वाटत नसून तो आपल्या या गुणांचें मोठ्या अभिमानाने वर्णन करतो ! सम्राटपद प्राप्त झाल्यावर कुणी रस्त्यांत पावली सापडल्याबद्दल आनंद मानील काय ? पण ब्रह्मानंद मिळाल्यावरहि श्रीहर्षाला राजमान्यता व पण्डितमान्यता यांची हाव आहेच ! यावरून समाधि हा एक क्षणिक अनुभव आहे, सर्व जीवनाच्या ज्ञानात्मक व नैतिक मूल्यावर या अनुभवाचा कांहीहि परिणाम होत नाही हें सिद्ध होतें.

बुद्धिवादाशिवाय गत्यंतर नाही

"सर्व जीवन नीतिमान करणारी व इतर साधनांनीं न होणारें ज्ञान करून देणारी समाधि मानसशास्त्रज्ञांच्या अवलोकनांत आजपर्यंत आली नाही, पण पुढे येणार नाही कशावरून ? विज्ञान काय शोध लावील हें आधीच कसें सांगावें ? खऱ्या समाधीचा शोध जर मनोविज्ञानाला लागला तर बुद्धिवाद खोटा पडेल की नाही ?" असा एक फार महत्त्वाचा तार्किक प्रश्न आतापर्यंतच्या विवेचनावरून उपस्थित होतो. या प्रश्नाचें उत्तर असें की खऱ्या समाधीचा शोध पुढे लागला तरी त्यावरून बुद्धिवाद खोटा पडणार नाही. कारण समाधींतलें ज्ञान खरें की खोटें व समाधीनें माणूस खरोखर नीतिमान झाला की नाही हें शेवटीं बुद्धिवादाच्या कसोट्यांनीच ठरणार आहे. दुर्दैव व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सूक्ष्मदर्शक यन्त्र यांच्या साहाय्याने साध्या इन्द्रियांना न होणारें ज्ञान होतें तरी तेवढ्याने साध्या इन्द्रियांचें प्रामाण्य कमी होत नाही; कारण दुर्बिण व सूक्ष्मदर्शक यांनी झालेलें ज्ञान खरें असतें हें आपण साध्या इन्द्रियांनी त्या ज्ञानाचा पडताळा पाहूनच ठरवतो. दुर्बिणीने दिसणारी दूरची इमारत जर तिच्याजवळ गेल्यावर **साध्या डोळ्यांना** दिसली नाही व सूक्ष्मदर्शकाने ज्या पाण्यांत कॉलऱ्याचा जन्तू दिसला तें पाणी प्याल्याने कुणालाच कॉलरा झाल्याचें **साध्या डोळ्यांना** दिसलें नाही तर आपण दुर्बिण व सूक्ष्मदर्शक हीं ज्ञानाचीं साधनें नसून भ्रमोत्पादक यन्त्रें आहेत असें समजूं. त्याचप्रमाणें समाधींत झालेलें ज्ञान जर बुद्धिवादाच्या कसोटीस उतरलें नाही., तर तें खरें समजतांच येणार नाही, म्हणून खऱ्या समाधीचा शोध लागला तरी त्यामुळे बुद्धिवाद खोटा पडण्याचें कांही कारण नाही.

आधुनिक मानसशास्त्राने बुद्धिवाद खोटा पाडून अध्यात्माची पुनः स्थापना केली आहे, या विधानाचा पोकळ फुगा फोडण्यासाठी कांही प्रमुख मानसशास्त्रज्ञांच्या अध्यात्मविषयक मतांचा उल्लेख केला पाहिजे. मनोविश्लेषण ही आधुनिक मानसशास्त्राची एक महत्त्वाची शाखा आहे. मनोविश्लेषणाचा अध्वर्यु फ्रॉइड हा अध्यात्माला भ्रम मानतो. भ्रम ही एक विकृति आहे. ही विकृति कामजीवनाचें संयोजन योग्य तऱ्हेने न झाल्यामुळे होते, असेंहि त्याचें म्हणणें आहे. फ्रॉइड नंतरचा मोठा मनोविश्लेषणज्ञ युंग. युंग हा अध्यात्मवादी म्हणून प्रसिद्ध आहे. पण त्याचा अध्यात्मवाद सर्वसाधारणपणें ज्याला अध्यात्म म्हणण्यांत येतें त्यापेक्षा फार वेगळा आहे. नात्सीवादासारख्या चळवळींचा समावेश तो अध्यात्मांत करतो. अध्यात्मसाधना म्हणजे आपल्या सुप्त व जागृत मनोव्यापारांतला विरोध नाहीसा करून त्यांच्यांत सुसङ्गति निर्माण करणें अशीहि त्याने एके ठिकाणीं अध्यात्माची व्याख्या केली आहे. अशी सुसङ्गति मनोविश्लेषणाने देखील निर्माण होऊं शकेल. अर्थात् युंगचा अध्यात्मवाद रूढ अर्थानें अध्यात्मवाद नाही. युंगनंतरचा प्रमुख मनोविश्लेषणज्ञ ॲडलर. हा देखील रूढ अर्थानें अध्यात्मवादी नव्हता. "मानव स्वभावतः अपूर्ण व हीन आहे. त्याला पूर्ण व श्रेष्ठ होण्याची हाव असते, म्हणून तो पूर्ण व श्रेष्ठ अशा ईश्वराची कल्पना करतो" अशी त्याची ईश्वरविषयक धारणा होती. म्हणजे त्याच्या मताने ईश्वर ही एक कल्पना आहे. त्याचप्रमाणें अध्यात्माची पापपुण्याची कल्पना त्याने त्याज्य ठरवली आहे. "माणूस पाप किंवा पुण्य करीत नाही. तो चुका करतो किंवा बरोबर वागतो. चुकीबद्दल वाईट वाटून ती सुधारण्याचा प्रयत्न करणें योग्य असले तरी 'मी पापी, मी नीच' अशी सारखी खन्त करीत बसणें मनःस्वास्थ्याच्या दृष्टीने अपायकारक आहे" असें त्याचें मत आहे.

आइन्स्टाइन व रसेल

बुद्धिवाद हें १९व्या शतकांतील विज्ञानाच्या पहिल्या उत्साहाचें अपत्य आहे, विसाव्या शतकांत विज्ञान जास्त प्रगल्भ झाल्यावर त्याने बुद्धिवाद टाकून दिला आहे असा प्रचार कधीकधी करण्यांत येतो. हा प्रचार खोटा आहे हें विसाव्या शतकांतला सर्वश्रेष्ठ वैज्ञानिक आइन्स्टाइन याचा ईश्वरावर विश्वास नव्हता यावरून स्पष्ट होतें. एका भारतीय विदुषीनें " तुमची ईश्वर व पुण्यवान् लोकांचें त्यांच्याशीं होणारें सायुज्य यावर विश्वास आहे काय ? " असें आइन्स्टाइनला विचारलें असतां त्याने त्या विदुषीकडे पाहात विनोदानें उत्तर दिलें " नाही. पण या गोष्टी खऱ्या असत्या तर किती बरें झालें असतें ! ईश्वराला किती मोहक सहचर मिळाला असता !"

आइन्स्टाइन हा कितीहि मोठा वैज्ञानिक असला तरी त्याचा अधिकार भौतिकी (Physics) पुरता मर्यादित होता. विख्यात तत्वज्ञ बर्ट्रँड रसेल याची गोष्ट तशी नाही. ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत त्याने अप्रतिहतपणें संचार केला आहे. गणित व तर्कशास्त्र हीं तर त्याच्यापुढे हात जोडून उभीं आहेत. विसाव्या शतकांतला तो सर्वांत मोठा तत्वज्ञ समजला जातो. हा बुद्धिवादाचा मोठा पुरस्कर्ता आहे. जे वैज्ञानिक कसोट्यांनी सिद्ध होऊं शकत नाहीं तें ज्ञानच नव्हे असें त्याने आग्रहाने प्रतिपादिलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" विज्ञानाशिवाय ज्ञान नाही " हें रसेलचें मत हिरीरीने उचलून धरणारा Logical Positivism तार्किक प्रत्यक्षवाद या नांवाचा एक वाद आधुनिक तत्वज्ञानामध्ये उदित झाला आहे. या वादाने तर अध्यात्मवादावर अगदी " मूले कुठारः " असा प्रहार केला आहे. Annihilation of Metaphysics अन्तिमशास्त्राचें उच्चाटन हें या वादाचें प्रधान कार्य असल्याचें त्याचे प्रवर्तक सांगतात. कांही वाक्यें अर्थशून्य असतात. सार्थ व निरर्थ वाक्यांत नक्की काय भेद असतो, याचा सखोल विचार तार्किक प्रत्यक्षवादानें केला आहे. फक्त सार्थ वाक्येंच खरीं किंवा खोटीं ठरूं शकतात. निरर्थक वाक्यें बोलूनचालून अर्थहीन ! तीं खरीं किंवा खोटीं आहेत असें म्हणणेंच अशक्य आहे. दगडावर दगड आपटणें व अर्थहीन वाक्य उच्चारणें यांत सत्यतेच्या दृष्टीनें कांही फरक नाहीं. अध्यात्मवादाचीं बहुतेक विधानें (वाक्यें) अर्थहीन असतात. अर्थात् तीं खरीं की खोटीं हा प्रश्नच गैरलागू आहे असें तार्किक प्रत्यक्षवादाचें मत आहे. (अध्यात्मवादावर एवढा गहजब विचाऱ्या चार्वाकानेंहि केला नव्हता !) ऑक्सफर्ड सारख्या प्राचीन विद्यापीठांतदेखील या वादाचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

विसाव्या शतकांतील विज्ञान व विचारप्रणाली यांचें क्षेत्र फार अवाढव्य आहे. त्या सर्वांचा परामर्श घेणें आवाक्याबाहेरचें आहे. पण " आधुनिक तत्वज्ञान बुद्धिवादापासून दूर जात आहे " हें मत किती निराधार आहे यांचें दिग्दर्शन होण्यापुरता प्रस्तुत विवेचनाचा उपयोग होईल अशी आशा आहे.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री. पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री. नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
२. नाटककार गडकरी	--श्री. द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	-कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०
५. सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—श्री. द. वि. तेंडुलकर (प्रफुल्लदत्त)	रु. ०-८-०
६. गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. म. श्री. पंडित	रु. ०-८-०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवितेमधील रम्यता

भास्कर कविमंडन

नुसतें 'कविता' असें म्हटलें की रसिकाला प्रसन्न वाटतें. आजपावेतो थोर कलाकारांनी या वाङ्मय-प्रकारांत प्रतिभेला खूप सजवून ठेवलें आहे. व तें तिचें रूप आगळें आहे, इतर कलांपेक्षा दीप्तिमान आहे. मोहक आहे. म्हणूनच कविता ही केवळ संज्ञाहि फार नाजुक व मधुर झालेली आहे. टागोरांनी सायंप्रहरीं निश्चित विस्तारलेल्या जलाशयांतील किंचित्–तरंगा-वलीला म्हणूनच, "तूं निसर्गाची कविता आहेस.." असें सहजच म्हणून दिलें आहे. कविता अशी उपमा-साधन बनली !

कविता कलेचा अत्युच्च अविष्कार आहे. पण एकुलता एक नव्हे. आणखीहि कांही कलावंत रसिकाला मोहवून टाकण्याची प्रतिज्ञा असते. मग केवळ कवि-तेलाच अखंड दीप्ती कां मिळावी ? कवि हा माणूस पुरातन बनतो पण त्याची कविता सनातन असते असें कां ? इतर कलांना हळूहळू ओसर लागतो व काव्याला मात्र म्लानता ठाऊक नाही, हें विशेष आहे. कवितेचें हें विशेष कशांत असावें ? या प्रश्नाचें संक्षिप्त विवेचन येथे करावयाचें आहे.

कोणी म्हणतात कवितेंत जो अर्थ असतो त्यांत सर्व अमृत साठवलें असतें. पण या विधानाचा अर्थ काय ? जसा कवितेचा अर्थ कळणें कठीण तसाच वरील विधानाचा अर्थहि कठीण !

कविता म्हणजे भावनांचें कारंजें; व तेंहि नित्य-नूतन आणि अकस्मात् उफाळणारें–अशी व्याख्या केली जाते. कवितेचा व भावनांचा घनिष्ठ संबंध असतो असें म्हटल्या जातें. या विधानांना चूक म्हणणें धाडसाचें आहे. परंतु त्यांतील कमाल स्थूलता त्यांना कवितेच्या व्याख्येपासून दूर नेते असें म्हणावें लागतें. कवितेची खऱ्या अर्थानें व्याख्या करणें जवळजवळ अशक्यच. कारण इतकी रेखीव शब्दमाला जमवावी कुठून ? 'कविता म्हणजे...कविताच ! ' असें विधान आवेशानें करतां येईल. पण त्यांत कवितेविषयीचा जिव्हाळा जरी प्रकटला तरी शास्त्राला तो कसा आणि कां पसंत पडून संमत व्हावा ? जेव्हा कविता मनाला प्रसन्न करूं लागते तेव्हा शब्द मागेच उरतात; मन वर जातें आणि बुद्धी गुंग होते. नंतर स्मरणांत ती अवस्था आठवली तर कवितेचे अनेक विशेष सफाईनें निसटून जातात. असें असलें तरी त्यांतल्या त्यांत रेखीवपणा वरील व्याख्येंत मुळीच नाही, म्हणून त्या व्याख्येला स्थूल म्हणावें लागतें.

या ठिकाणीं आणखी एक मुद्दा स्पष्ट करावा लागेल. तो म्हणजे, कविता व काव्य या दोन शब्दांत फरक मानल्या गेलेला आहे. कविता हा एक वाङ्मय-प्रकार आहे की ज्यांत काव्य हा प्रधान घटक असा-वाच. काव्याला गुण म्हणतां येईल की जो कवितेंत असतो. कविता मर्यादित असते. काव्य अमर्याद आहे. काव्य जर मर्यादित झालें तर काव्यच उरणार नाही व कवितेने जर तिच्या मर्यादा सोडल्या तर निव्वळ उद्दामपणानें ती काव्याला गमावून बसेल. कविता व काव्य हे तुटक तर निश्चितच नाहीत, पण एकहि नव्हेत. कविता ही भावनांचा उन्मेष आहे, उद्रेक आहे हीं विधानें म्हणूनच कविता प्रकाराच्या नाजुक रूपाला धक्का देणारीं आहेत. असह्य आहेत.

उन्मेष किंवा उद्रेक मर्यादित कधीच असत नाहीत. मर्यादित उन्मेष ही शब्दयोजना विरोधी व गमतीदार झाली. आणि अमर्यादा हा विशेष गुण असलेल्या उन्मेषाला मर्यादित व संकोचणारी लाजाळू

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता कशी काय योग्य वाटावी ? कवितेची मृदु प्रकृती त्या उन्मेष गुणाची प्रखरता व अकस्मातता साहूं शकणार नाही. जर मग खळाळणारा हा भावनोन्मेष कवितेंत समावलेला नसेल तर मग या थंड तत्र्वेतीऱ्या कवितेने परमहर्ष कां द्यावा ?

'कारण कवितेंत अर्थ असतो', हें उत्तर पुढे येईल. पण कवितेंत अर्थ असतो असें म्हणून तिलाच व्यक्तित्व देण्यापेक्षा असें म्हणावें की 'कवितेला अर्थ असतो.' कविता ही कांही स्वतंत्र, स्वत्वयुक्त बाब नाहं. तिला अर्थामुळे जिवंतपणा येतो. हा अर्थ कवितेला विश्वापासून मिळतो. आणि हाच कवितेला मिळालेला अर्थ रसिकांना लुब्ध बनवितो.

परंतु कोणत्याहि गोष्टीचा अर्थ म्हणजे काय ? पदार्थाच्या परमाणूचा अर्थ म्हणजे त्यांतील अंतर्रचनेचें वर्णन, खुद्द अंतर्रचना नाही. कारण वस्तूचा अर्थ हा अस्थायी गुण आहे. वस्तूला अर्थ प्राप्त होतो म्हणजे ज्ञात्याच्या दृष्टीने, त्या वस्तूच्या दृष्टीने नव्हे. परमाणूची रचना माहीत नसतांना तो आम्हाला कोरा व निरर्थक वाटत असेल, म्हणून त्यावेळीं त्याची अंतर्रचना अनिर्मित होती असें नव्हे. तिचा अर्थ आम्हांला कळला नव्हता इतकेंच. अर्थ आणि अस्तित्व दोन स्पष्ट अलग गुण आहेत. अस्तित्व हें वस्तूला मिळालेलें असतें पण अर्थ हा घडवावा लागतो, जुळवावा लागतो.

जर कवितेला अर्थ असेल तर हा अर्थ कोणी घडविला असतो, कोणी जुळविला असतो ? दोन शक्यता आहेत. कवितेला मिळालेला अर्थ माणसानेच (रसिकनें) जुळविला असेल किंवा स्वतः कवितेने जुळविला असेल. जर कवितार्थ माणसाने जुळविला असें समजलें तर कविता ही एक फाटकी संस्था ठरते. व तिच्या सौंदर्याचा धडधडीत अपमान होतो. सुंदर कवितेला काय साध्या माणसाने सौंदर्य द्यावें ? नाही. शिवाय माणूस जर असा अर्थ देऊं शकत असेल तर मग कवितेप्रमाणे इतर कलामाध्यमें त्यास कां म्हणून समृद्ध करतां येऊं नयेत ? म्हणून कवितेला अर्थ माणूस देऊं शकत नाही असें अनुमान काढावें लागतें. दुसरी शक्यता, कविता स्वतः अर्थ मिळवून स्वतःच स्पष्ट करीत असेल. पण असें जर झालें तर कवितेला स्वतंत्र अस्तित्व आहे असें म्हणावें लागेल. व स्वार्थांत गुंतलेली एक कविता गृहीत धरावी लागेल. जर कविता स्वतःचा अर्थ सांगूं लागली तर तिचें भोळें, अहेतुक सौंदर्य नष्ट होईल. म्हणून असाहि अर्थ कवितेला असूं शकत नाही. या दोन शक्यता बाद झाल्यावर सहजच अनुमान निघतें की अर्थ हा कवितेला कधीच नसतो!

कवितेंत भावनांचा उन्मेष किंवा कोणताहि अर्थ नसतो, तर मग कविता परमहर्ष देते हें खोटें आहे काय ?

नाही. तें खरेंच आहे. तो परमहर्ष मिळतो हें अनुभवलेलें सत्य आहे; त्याला नाहीसें करण्याची ताकत बुद्धी व तर्क यांत नाही. पण भावनोन्मेष किंवा अर्थ नसलेली कोरी करकरीत कविता असा प्रगल्भ व अत्युच्च हर्ष कसा काय देऊं शकते ? हा प्रश्न मात्र योग्य आहे. कविता खरोखर असा परमहर्ष देऊं शकत नाही. हा हर्ष मिळतो पण तो कवितेपासून नव्हे !

आणि यानंतर आपणाला कविता ज्या स्थितींत असते ती सोडून विचार करावा लागतो. व कवितेच्या शुद्ध स्वरूपाला घडविणाऱ्या गुणाकडे धाव घ्यावी लागते. कवितेचें निर्माणस्थल काव्य आहे. कवितेहून थोर काव्य आहे. काव्याच्या सामर्थ्यावर कविता जगते. हें काव्य कवितेप्रमाणे मर्यादित असत नाही. म्हणून त्यांत परमहर्ष देऊं शकणारा भावनोन्मेष किंवा अर्थ राहूं शकतात हें निरीक्षण सुरवातीला जरी ठीक वाटलें तरी थोड्या चिंतनानंतर अपुरें वाटूं लागतें. काव्य म्हणजे एक गुण, की जो कवितेंत असतो असें आपण म्हटलें होतें. काव्य जर एक गुण असेल तर तो कितीहि अमर्याद असला तरी त्याला स्वतःचें अस्तित्व नसेलचः हा गुण कोणातरी व्यक्तीचा असलाच पाहिजे. कविता या वाङ्मयप्रकारांत काव्य हा गुण अर्थातच कवीचा असतो. हा गुण प्राप्त झाल्यानंतर त्याचा आविष्कार विशिष्ट पद्धतीने होऊन कविता तयार होते व ही कविता वाचून, जाणवून परमहर्ष होतो असें मग म्हणावें लागेल.

म्हणजे कवीच्या वैयक्तिक गुणाच्या दर्शनाने रसिकाला परम आनंद होतो. पण असें अनुमान

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विसंगत आहे. परमहर्ष फक्त एकाच तऱ्हेने होऊं शकतो; व ती तऱ्हा पूर्णतः वैयक्तिक असते. दुसऱ्याला सहानुभूतीने जाणून मी आनंदित होऊं शकेन पण या आनंदास सीमा राहील. हा आनंद दुसऱ्यामुळे झाला ही कमीजास्त प्रमाणांतील जाणीवच सीमा बनेल. व असा सीमित आनंद परमहर्षाच्या तोडीचा ठरत नाही.

जर काव्य हा कवीचा गुण असेल तर तो नेहमी त्याचाच गुण राहाणार आणि पूर्णतः माझा कधीच होणार नाही. व म्हणून त्यापासून वाटणाऱ्या हर्षाला सीमा राहणारच.

पण कवितेपासून तर असीम आनंद मिळतो हें अनुभवलेलें सत्य आहे. हा आनंद कविता या प्रकारांत नाही, त्यास जन्म देणाऱ्या काव्यगुणांत नाही तर आहे तरी कुठे ? या प्रश्नाचें थोडक्यांत उत्तर देऊन विवेचन आटोपतें घेऊं.

आपण या बाबतींत तीन अवस्था मानूं या. या तीन अवस्थांच्या सीमा कुठे स्पष्ट आहेत याचा विचार येथे करायचा नाही. एकच लक्षांत घ्यावयाचें की, एक अवस्था संपल्यानंतर दुसरी सुरू होते असे मुळीच नसून एकीमधून दुसरी सहज उमलते.

यांपैकी पहिली अवस्था 'सीमितावस्था'. यांतच आविष्कृत कविता (वाङ्मय प्रकार) असते. दुसरी 'गुणयुक्त अवस्था'. यांत काव्य हा गुण असतो. आणि तिसरी, अखेरची व फार महत्त्वाची अवस्था म्हणजे 'प्रत्ययावस्था', की ज्या अवस्थेंत खरा परमहर्ष रसिकाला मिळतो. काव्यानंदा-विषयी विस्ताराने विवेचन येथे करावयाचें नाही. म्हणून वरील विधानांचें स्पष्टीकरण येथे देतां येत नाही. पण एक उल्लेख केलाच पाहिजे की तिसऱ्या अवस्थेंत रसिक हा गेल्याखेरीज त्याला परमोल्हास कधीच भेटत नाही.

कवि हा त्याला प्राप्त झालेल्या काव्यगुणाने विश्वाचीं भिन्न दर्शनें अनुभवीत असतांना तिसऱ्या उत्कट अवस्थेंत जातो. आणि तो अनुभव आल्यानंतर अनिच्छेनेच पहिल्या अवस्थेंत येऊन त्या आठवणी लिहीत बसतो. कविता ही एक नाजूक निमंत्रण घेऊन आलेली कलिका असते. कवि रसिकाला याच मार्गानें 'ये' म्हणतो आणि पुढे सरकत जाऊन तिसऱ्या अवस्थेंत (की ज्यांत प्रत्ययामुळे कवीला उत्कटानंद मिळाला असतो) 'जा' म्हणतो. कवि जणू त्याच्या मनांत रसि-काला बोलावीत असतो.

कविता वाचल्यावर प्रथम तिच्या तंत्रमंत्रादि भानगडी लक्षांत येतात. नंतर अर्थ कळल्यावर काव्य लागतें आणि कवीचें विशालत्व मोहवितें. पण जर खरा रसिक असला तर तो कवीलाहि विसरून जातो व कवीने वर्णिलेली अवस्था तो स्वतः प्राप्त करून घेतो. ती अवस्था स्वतः अनुभवितो. टागोरांच्या कविता श्रेष्ठ व दिव्य त्यालाच खऱ्या अर्थाने वाटतील की जो टागोरापाशीं कौतुकाने थांबणार नाही, तर स्वतःच टागोर बनून जाईल. हें फार अवश्य आहे. साऱ्या कविता स्वतःच्या झाल्याशिवाय खरी रम्यता मिळ-णार नाही.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

" प्रतिष्ठान " कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पहिल्या अवस्थेंत सर्वच जडवस्तु, सीमित वस्तू असतात....कविता हा प्रकार, कवि ही व्यक्ति, रसिक हा आणखी तिसरा, आणि अर्थप्राप्तीस्तव धडपड ही चवथी, अशा ह्या सर्वच जड वस्तु ! (साधारणतः कविता हा शब्द पहिल्याच अवस्थेला उल्लेखिण्यास वापरतात.) अशा विस्कळित स्थितींत हृद्य रम्यता कधीच असूं शकत नाही.

कवितेंत जो अर्थ असतो असें म्हणतात तो नव्हे तर तिच्या पलिकडे जें जाणवतें (व जें रसिकाला जाणवणें अटळ असतें) तें खास उल्हासमय असतें. अर्थात या तीनहि अवस्था मिळून होणाऱ्या एका संपूर्ण घटनेलाच जर " कविता " असें संबोधलें तर गोष्ट वेगळी. सामान्य शब्दापेक्षा हा शब्द फार वेगळा होईल.

सामान्यतः जिला आपण कविता म्हणतों तिचें विशेष तिच्या विलक्षण नम्रतेंत आहे. ही पहिली अवस्था क्रिय किंवा अनंत नसते, तर केवळ नम्र असते. म्हणूनच तिच्या निवांत सहवासांत काव्य आणि प्रतीति लहरूं शकतात. या कवितेची मुग्धता विलक्षण यासाठी म्हणायची की तिच्यांत रसिकाला निमंत्रण आहे. लाजरें का होईना पण निमंत्रण आहे. जर हीच कविता उर्मट झाली तर तिच्या मुग्धतेंतच राहणारें निमंत्रण लुप्त होईल व रसिकाला काव्य आणि प्रत्यय कधीच मिळणार नाही. उत्कटानंदाच्या आविष्काराला कविता-प्रकार युगानुयुगें मानवलेला आहे याचें कारण कविता अत्यंत हळुवार व मुग्ध आहे हेंच होय. कवितेची रम्यता तिच्या मुग्धतेंत आहे.

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा !

सभासदांचे वर्ग

(अ) **उपकर्तेः**—संघास पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदातेः**—संघास एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यकः**—संघास पांचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतकः**—संघास अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

वरील (अ) ते (ई) वर्गांच्या सभासदांना आपली रकम देतांना ती विशेष कार्यासाठी नमूद करून देतां येईल. पण अशा रकमेंतून आजीव सभासदत्वाची वर्गणी रु. ५० वगळण्यांत येईल.

(उ) **आजीव सभासदः**—संघास पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासदः**—संघास वार्षिक तीन रुपये देणारे.

(ए) **प्रतिनिधि सभासदः**—नियमाप्रमाणे संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधि.

(ऐ) **सन्मान्य सभासदः**—मराठी भाषेची विशेष सेवा अथवा विद्वत्ता या गुणासाठी कोणाहि व्यक्तीस संघाचे सन्मान्य सभासद करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

वयाचीं २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी भाषाप्रेमी व्यक्तीस सभासद होतां येईल. त्याकरिता वर्गणी व आवेदनपत्र भरून केंद्रीय कार्यालयांत पाठवावें. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यांत येतात.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षण

The Indus Civilisation in the Rigveda

लेखक : श्री. अप्रबुद्ध

[लेखक व प्रकाशक Shri P. R. Deshmukh, Yeotmal. पृ. ९६, मू. २ रु.]

हल्लीच्या साहित्य आणि ललितकलांच्या मन्वंतरांत भारदस्त विषयाचा ध्यास घेणारेच आधी कमी. त्यांतून खोल व्यासंगाची आवड असलेले लेखक तर केवळ दुर्मीळच. मधून मधून सुदैवानेच एकादा विद्वान आपल्या परिश्रमाचे सार लोकांपुढे ठेवीत असतो. त्यामुळें त्याचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच. अशा विरळ व्यक्तींत यवतमाळ येथील श्री. देशमुख यांची गणना करावी लागेल. आपला नित्याचा वकीलीसारखा व्यवसाय सांभाळून ऋग्वेदासारख्या क्लिष्ट वाङ्मयाचा ध्यास घेणें ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. साहित्य सम्राट तात्यासाहेबांनी म्हटल्याप्रमाणें ऋग्वेद ही वाग्युद्धभूमि आहे. त्या भूमीवर उतरून आपल्या परिश्रमाचें सार The Indus Civilisation in the Rigveda या पुस्तिकेच्या रूपानें जनतेस सादर करणारे श्री. देशमुख खरोखरच अभिनंदनीय आहेत.

अशा प्रकारच्या व्यापक आणि विवाद्य प्रयत्नांत प्रत्यक्ष यशापयशाला महत्व नसतें. कारण त्याचा निर्णय कालाच्या ओघांत अनेक रीतींनी व्हावयाचा असतो. तत्कालीन महत्व लेखकाच्या परिश्रमांचेंच असतें. अशा दृष्टींनी पाहिलें तर कोणीहि श्री. देशमुख यांच्या परिश्रमांचें कौतुकच करील.

या वटमूर्ती ग्रंथाचे बारा परिच्छेद असून त्यांतील मुख्य प्रतिपाद्य लेखकाने स्वतःच म्हटल्याप्रमाणें the civilisation of the enemies of the Rigvedic Aryans found in the Rigveda was identical with the Indus Valley civilisation, recently excavated at Harappa and Mohan jodaro' म्हणजे 'हरप्पा व मोहन जो दडो येथील उत्खननांत आढळून येत असलेली संस्कृति ही ऋग्वेदांत उल्लेखली गेलेली ऋग्वेदी आर्यनांच्या शत्रूंची संस्कृतीच होय' हें लेखकास प्रतीत झालेलें सत्य जनतेस समजून देणें हेंच आहे.

प्रस्तुत काळीं 'संशोधनशास्त्र' कितीहि वाढलें असलें तरी या अतिभूतकालीन संशोधनासंबंधी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की पुष्कळ अंशीं हा साराच एक चुटक्यांचा मांडव असतो. कारण ज्याला अगदी सप्रमाण म्हणतां येईल अशी पूर्णतया सत्याधिष्ठित 'इतिहास' म्हणून कांही वस्तु असणेंच कठीण. सप्रमाण व सत्य म्हणविल्या जाणाऱ्या इतिहासांत देखील कल्पना आणि भावना यांचें कल्पनातीत आधिक्य असतें. (But history is a heap of data in which one can bring to light examples to prove almost any theory one wishes. p. 35, The Scientific Attitude) या कालांतील उपलब्ध असलेला बहुतेक सारा पुरावा त्रुटित, खंडित, विलग, अस्ताव्यस्त असा असतो. त्यामुळे मानवेंद्ररायांनी म्हटल्याप्रमाणें थोडयाशा कुशलतेने त्याचे हवे तसे अर्थ लावून ते सुसंगत आहेत असें भासवतां येणें शक्य आहे. (As regards the past with some ingenuity faedts may be fitted into any preconceived theorotical patterne. p. 35136 New Humranism). खेदकारक गोष्ट अशी आहे की भारताच्या अतिप्राचीन इतिहासाची रचना करूं पहाणाऱ्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाश्चात्य पंडितांचा बव्हंशीं प्रकार असाच झाला आहे, हें अजूनहि आमच्या इकडील विद्वानांच्या लक्षांत येत नाही. त्यामुळे, त्यांनी प्रसृत केलेल्या अनेक प्रामाणिक अप्रामाणिक असंभावना आणि विपरीत भावना आम्ही अजूनहि पतीच्या पादुका उराशीं धरून चितेवर आरोहण करणाऱ्या एखाद्या पतिव्रतेच्या निष्ठेनें कवटाळून वसलों आहोंत !

मॅक्स मुल्लरनें जन्मास घातलेला 'आर्यन वंश' आणि 'आर्यनांचें (आर्यांचें नव्हे !) आक्रमण या दोन अशाच प्रकारच्या निष्ठा आहेत. हीं सारीं गुडघ्याला बांधलेलीं उतावळीं बाशिंगें आहेत (far too hasty conclusions) असें आता कित्येक विटरनिट्झ म्हणूं लागले आहेत, ही गोष्ट अशा प्रकारच्या लिखाणांत न विसरणें आता अत्यंत अवश्य झालें आहे. आक्रमणासंबंधी रशियन लेखक 'डायकोव्ह' तर असें म्हणतो की त्या साऱ्याच कल्पना पुष्कळांना भ्रामक वाटूं लागल्या आहेत. (This theory, which is based upon the typographical similarity between the languages of Northern India i.e. the new Indian languages, and the languages of Asia Minor and Europe meets with serious objections particular in the light of the new teachings on languages.)

मॅक्समुल्लर विषयी मी अन्यत्र लिहिलें आहे. यां लेखांत त्याचा निर्देश करण्यापलीकडे जास्त कांही लिहिणें म्हणजे, 'अप्पा शेरभर तर गळ्यांतील लिंग धडाभर' असा प्रकार होईल. परंतु त्याच्या सर्व प्रयत्नाचें सार मॅडम ब्ल्याव्हाट्स्की या थिऑसफीच्या मूळमातेनें थोडक्यांत मोठें सुंदर दाखविलें आहे. Having, in fact, discovered only "three ancient centres of religion" and "three centres of languages", and though as entirely ignorant of those primitive religions and languages as of their origin—the Professor does not hesitate to declare "that a truely *historical basis* for a scientific treatment of the principle religions of the world" has been gained !

The Secret Doctrine, Vol. I.,
Introduction p. 52, Adyar Ed.

" प्राक्कालीन धर्मांचीं तीन केन्द्रें आणि भाषांचीं तीन पीठें शोधून काढलीं असें वाटल्यावरोबर धर्मांचें शास्त्रशुद्ध संशोधन करण्यास आवश्यक असलेली (सर्व) ऐतिहासिक सामग्री आपण शोधून काढली असें म्हणून टिरी बडवण्यास प्रोफेसर मजकूरांस यत्किंचित देखील दिक्कत वाटत नाही !"

या शास्त्रशुद्ध संशोधनाविषयीं तिनें काढलेले उद्गारहि असेच चिंतनीय आहेत. थोडे विस्तृत असले तरी विषयांतील मुख्य मुद्दा लक्षांत यावा म्हणून ते येथे उतरून घेत आहे.

A "scientific treatment" of a subject is no guarantee for its historical basis............No doubt, the Orientalist has thoroughly proved to the world's satisfaction that, according to the phonetics of Grimm's Law, Odin and Buddha are two different personages, quite distinct from each other, and has proved it *scientifically*. When, however, he takes the opportunity of saying in the same breath that Odin "was worshipped as the supreme deity during a period long anterior to the age of the Veda and of Homer" he has not the slightest "*historical basis*" for it, but makes *history* and *fact* subservient to his own conclusions, which may be

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

very "scientific" in the sight of oriental scholars, but very wide of the mark of actual truth. The conflicting views of the various eminent Philologists and Orientalists,..........down to Prof. Max Muller himself........are evident proof that the statement has no "historical" basis to stand upon, "eternal evidence" being very often a Jack o'—lantern, instead of a safe beacon to follow. (Ibid, P. 53). बाईच्या म्हणण्याचा भावार्थ असा आहे की, "अशा सर्व संशोधनांत लेखन जरी अत्यंत शास्त्रीय आणि तर्कशुद्ध असलें तरी मूळ गृहीत धरलेले सिद्धांतच विवाद्य असल्यामुळे सत्याचा अंश वेळीं यत्किंचित देखील नसूं शकेल. भाषेच्या अभ्यासाने जरी एखाद्या मोक्षमुल्लरने अगदी 'ग्रीम'च्या ध्वनिशास्त्राप्रमाणे सिद्धांत काढले आणि ते बरोबरहि जरी असले तरी त्यामुळे, तो जेव्हा पुढे जाऊन त्या वेळच्या मानवजातीसंबंधी निर्णायक सिद्धान्त बाधूं लागतो व कालानुक्रम सांगूं लागतो तेव्हा त्यांत कल्पनाशक्तीचा विलासच जास्त असल्यामुळे सत्याचा कित्येक वेळां केवळ खून असण्याचा संभवच जास्त. त्यांच्या मागें जाणें म्हणजे केवळ चकव्याच्या मागें धावण्यासारखेंच आहे". खुद्द मोक्षमुल्लरच्या वाङ्मयांतच याविषयी भरपूर पुरावा आहे.

प्रस्तुत निबंधाचा प्रकारहि असाच झाला आहे. आर्यन वंश, भारतावरील त्याचें आक्रमण आणि त्याचा पाश्चात्यांनी आपल्या करंटचा कालकल्पनेनें ठरविलेला काल या तीन असिद्ध प्रमेयांवर त्याची उभारणी केली असल्यामुळें वरील सर्व लिखाणच विवाद्य झालें आहे. विषयाचें महत्त्व व व्याप वस्तुत: फार मोठा आहे व त्याचा संबंधहि अनेक शास्त्रांशीं येतो. त्या सर्वांचा यथायोग्य समाचार न घेतां आणि सबंध पुराव्याची साकल्याने छाननी न करितां केवळ डॉ. पुसाळकर अथवा ऋग्वेदाच्या कांही ऋचा यांच्या सहाय्याने सर्व गूढ उकललें असें म्हणणें सयुक्तिक होणार नाही. असें करण्याच्या भरांत कित्येक महत्त्वाच्या मुद्यांकडे कसें दुर्लक्ष होतें याचीं एकदोन उदाहरणें देतों, म्हणजे लेखाचा अपुरेपणा सहज लक्षांत येईल. सर, जॉन मार्शलला सर्वांत आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट सिंध उत्खननांत ही आहे की शहरांचा नाश पुन: पुन: झालेला आहे व अगदी एका सारखीं एक अशीं तीं एकावर एक पुन:पुन: बांधलीं गेलीं आहेत. मार्शलच्या मताने या सर्व शहरांना कमींत कमी ५०० वर्षें तरी लागलीं असावीं. या घटनेचें व या कालावधीचें संशोधनांत कांही महत्त्व आहे. त्यांतीलहि विशेष असा आहे कीं पुन:पुन: झालेला हा शहरांचा नाश लढाई मुळे झालेला नाही. सिंध संस्कृतीचे म्हणवले जाणारे लोक लढाऊ नव्हते हें सर्वमान्यच आहे. श्री. देशमुखांनाहि मान्य आहे. श्री. देशमुखांनी ज्यांना चेंगीझखानाचे अनुयायी बनवलें आहे त्या आर्यनांच्या विध्वंसक पराक्रमाचें जें एवढें स्तोम ऋग्वेदाने गाइलें आणि सहा सहा हजार लोक कापून काढण्याइतकीं घनघोर युद्धें जीं त्यांनी केलीं तीं काय या नि:शस्त्र प्राचीन गांधीवाद्यांविरुद्धच होतीं ? ऋग्वेदांत ठिकठिकाणीं जी शत्रूवर विजय मिळविण्याकरिता दैवी सहाय्याची अपेक्षा केली आहे तीं काय शेंदाड शिपायावर कसाबसा जय मिळविण्या करितांच काय ? मोठेच शूर म्हटले पाहिजेत ते आक्रमक आर्यन ? तरी बरें आहे. ऋग्वेद म्हणजे कांही इतिहास नव्हे, असें श्री. देशमूख स्वत:च म्हणताहेत. (The Rigveda is neither history nor poetry p. 2) परंतु ऋग्वेदाचा उपयोग मात्र त्यांनी इतिहासासारखा आणि तोहि पाश्चात्यांच्या पावलावर पाऊल टाकून केला आहे. त्यांतील कित्येक शब्द आणि भारतांतील प्राकृत भाषा या फार मोठ्या विषयाची बोळवणहि त्यांनी केवळ युरोपियन लेखकांच्या 'असें होणें शक्य आहे' 'असें झालें असावें' अशा ठराविक पद्धतीने केली आहे. ("might have been" or 'might be") त्याविषयी थोडक्यांत येवढेंच म्हणतां येईल की त्याने सिंध संस्कृति व कल्पित आक्रमक यांच्यासंबंधी या कोणत्याच प्रश्नावर काडीइतकाहि प्रकाश पडत नाही. या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अतिप्राचीन लिपीविषयी ब्रिटिश ज्ञानकोशानें एकदा दिलेली सूचना फार महत्त्वाची आहे.

It must be remembered that the reading of most of the early Sumerian proper names is merely provisional, as we do not know how the ideographs of which they are composed were pronounced in either Sumerian or Assyrian. म्हणजे अर्थसाम्य जरी बसवतां आलें तरी या मूळ लिपींतील अक्षरांचे उच्चार कसे करीत असत हें कळण्यास सुतराम कांहीच मार्ग नाही. अस्तु.

श्री. देशमूख यांस नम्रपणें अशी सूचना करावीशी वाटते की अशा प्रकारच्या विषयास लागणारी संशोधक दृष्टि व इतिहासाची आवड त्यांच्या ठिकाणीं खासच आहे. व्यासंगाचीहि कमतरता नाही. तेव्हा येवढ्या मोठ्या विषयाची वोळवण इतक्या वरवरच्या लिखाणानें न करतां, त्याचा एकंदर व्याप लक्षांत घेऊन सखोलपणानें ते करतील तर एका अतिशय उपयुक्त ग्रंथाची भर संशोधनाचे प्रांतांत ते निःसंशय टाकूं शकतील. तसें त्यांनी अवश्य करावें अशी त्यांना विनंती आहे.

ग्रं थ स मा लो च न

लहरी

[लेखक—र. गं. विद्वांस, इनामदार ग्रंथ प्रकाशन, पुणें २., मू. २ रु., पृ. १२६.]

मानवी मनाच्या अथांग सागरांत निर्माण होणाऱ्या लहरींचें मनोहारी दर्शन 'लहरीं'तून विद्वांसांनी घडवून दिलें आहे. भीषण लाटांचें तांडवनृत्य जरी ह्यांत नसलें तरी आपल्या तुषारांनी रसिक हृदयाला ओलेंचिंब करणाऱ्या खेळकर लहरींचें मनमोहक नर्तन चित्त वेधून घेतें. मध्यमवर्गीय जीवन हा या कथांचा केन्द्रबिंदु होय. पांचट प्रेमाच्या गुलगुलित आणि अतिरंजित अशा कथा न लिहितां वास्तवपूर्ण जीवनदर्शी कथा लिहून त्यांनी कथांचें वेगळेपण सिद्ध केलें आहे.

आजकालच्या उत्तम, भडक व गल्लाभरू चित्रपटांचा तरुण पिढीवर कसा अनिष्ट परिणाम होत आहे, ह्याचें सुंदर चित्र त्यांनी 'प्रगति' आणि 'एक दिवसाची गोष्ट' ह्यांत रेखाटलें आहे. आर्थिक विवंचनेमुळे मध्यम वर्गातील व्यक्तींच्या सर्वसामान्य गरजा पुरवितांना कसे नाकीं नऊ येतात आणि आपला भासमान दर्जा कायम ठेवतां ठेवतां कशी त्रेधातिरपिट उडते ह्याचें चित्रण 'खोटें कवी बोलूं नयें' आणि 'ऑम्लेट' आणि 'लहर' यांत केलें आहे. आयुष्याच्या उत्तरार्धांत चुकीचा धंदा स्वीकारल्यामुळे अपेशी बनलेल्या पश्चात्तापदग्ध जोशी वकिलांचें चित्र हृदयाला हलवून सोडतें. त्याचप्रमाणे व्यसनासक्त मनुष्याला आपली तलफ भागविण्यासाठी किती लाचारी पत्करावी लागते व कित्येकदा कसा फटका बसतो, ह्याचें 'मनोहर' (काडी) हें मूर्तिमंत उदाहरण होय.

पोरका अनाथ मधू खिसेकापूंच्या टोळींत सापडल्यानंतर सुद्धा उच्च संस्कारामुळे अधोगतीपासून कसा बचावतो ह्याचें वर्णन त्यांनी 'माघार' यांत केलें आहे. मोठ्यांचा आदर्श समोर ठेवावा. त्यांच्या उपदेशाप्रमाणे चालावें, ह्या बोधामृतप्राशनानें प्रभावित झालेला लहानसा भिकू प्रत्यक्ष जगांत, पहिलेंच 'सत्कृत्य' करतो तेव्हा त्याला मिळालेली शिक्षा बघून त्याच्याइतकेंच वाचकांनाहि वाईट वाटतें.

माहेर, रंगभूमि, वित्त आणि अन्न ह्या कथांतून स्त्रीमनाच्या विविध पैलूंचें दर्शन वाचकांना होत असतें. 'माहेरा'विषयी असलेला नवोढा वधूचा ओढा,.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रेसकोर्सवर पैसे उधळणाऱ्या व्यसनासक्त पतीमुळे त्रस्त झालेल्या वत्सलेची करुण मूर्ति हृदयांत कारुण्य निर्माण करते. नक्षत्रासारखी सुंदर, लावण्याने परिपूर्ण युवती वेडसर, मुकी असावी हें पाहून आनंदाप्रमाणेंच रसिकांना कठोर नियतीची आठवण होते आणि जग ही एक 'रंगभूमि' आहे असें त्यालाहि पटूं लागतें.

वरील कथांतून विशाल अन् व्यापक जीवनाचें सर्वांगीण दर्शन घडत नसलें तरी त्यांत अनुभूतीची सखोलता असल्याने जिव्हाळा, उत्कटता ओतप्रोत भरलेली आहे. याशिवाय हुवेहुब चित्र उभे करणारी रेखीव, अकृत्रिम, साधी व सोपी प्रसादपूर्ण शैली असल्याने साऱ्या कथा वाचनीय झाल्या आहेत. 'लहरी' हा कथासंग्रह वाचून रसिकांच्या अंतःकरणांत आनंदाच्या लहरी निर्माण होतीलच यांत शंका नको.

रा. प्र. अ.

काणेकर : व्यक्ति आणि वाङ्मय

[संपादक—अविनाश केळकर, पृष्ठें २२ + १७२; प्रकाशक—सुरेश राऊत; २५, अवंतिका वाई गोखले रस्ता, गिरगांव–मुंबई, मूल्य ५ रु.]

गेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. अनंत काणेकर यांच्या व्यक्तित्वाचें व वाङ्मयाचें दर्शन घडविणारा हा ग्रंथ काणेकरांच्या एकावन्नाव्या वाढदिवसाच्या निमित्तानें प्रकाशित करण्यांत आला असून मराठींतल्या नामवंत टीकाकारांनी या ग्रंथाच्या सिद्धीकरणास हातभार लावलेला आहे. प्रा. काणेकरांचें वाङ्मयीन कर्तृत्व साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान भूषविण्याइतकें मोठें आहे, तरीहि त्यांना तो मान मात्र मिळालेला नाही, असा विषादपूर्ण उल्लेख ग्रंथाचे प्रस्तावक श्री. खांडेकर यांनी केला आणि योगायोग असा की याच वेळीं प्रा. काणेकर यांनाहि औरंगावाद साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद प्राप्त झालें ! प्रा. काणेकरांच्या जीवनांत योगायोगाला फार महत्त्व आहे. ते कवि म्हणून प्रसिद्ध झाले तेहि योगायोगानेंच ! लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराचें लेखन त्यांनी केलें तेंहि 'संजीवनी'चे संपादक श्री. प्रभाकरपंत कोल्हटकर यांच्या 'संजीवनी'-साठी एक पृष्ठ मजकूर लिहिलाच पाहिजे या आग्रहामुळेच !—ते प्राध्यापक झाले यालाहि कारण योगायोगच !—अशा प्रकारें त्यांच्या योगायोगप्रधान आयुष्यांत या ग्रंथाच्या निर्मितीचाहि योगायोग स्वाभाविक वाटतो !—प्रस्तुत ग्रंथांत एकूण बारा लेखकांचें काणेकर–वाङ्मयाच्या व व्यक्तिमत्वाच्या विभिन्न पैलूंचें दर्शन घडविणारें साहित्य असून स्वतः काणेकरांनी भारतीय आकाशवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित केलेलीं दोन भाषणें—१. लेखनकलेंतील माझे प्रयोग व २. गणूकाका—समाविष्ट केलेलीं आहेत. डॉ. गं. व. ग्रामोपाध्ये, प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. रा. भि. जोशी, श्री. प्रभाकर पाध्ये, प्रा. वा. ल. कुळकर्णी व आचार्य प्र. के. अत्रे इत्यादि काणेकरांच्या व्यक्तित्वाचें व वाङ्मयाचें दर्शन घडविणाऱ्यांचीं नांवें पाहिलीं तरीहि प्रस्तुत ग्रंथाच्या महत्तेची जाणीव होऊं शकेल. मात्र या लेखकांचीं सारींच मतें ग्राह्य आहेत असें नाही. स्वतः वि. स. खांडेकर यांनीहि आपल्या 'दोन शब्दां'त कांही आक्षेपार्ह विधानांचा परामर्श घेतला आहेच. लेखकांनी उपस्थित केलेल्या साहित्यविषयक प्रश्नांची चिकित्सा करतां आली असती तर चांगलें झालें असतें. पण परीक्षणाची स्थळमर्यादा लक्षांत घेतां तसें अशक्य आहे. मात्र एवढें नमूद करावेसें वाटतें की प्रस्तुत पुस्तकांतील लेख वस्तुनिष्ठ भूमिकेवरून लिहिलेले असले तरीहि एकंदर साऱ्याच समीक्षणावर स्वतः श्री. काणेकरांच्या व्यक्तिमत्वाचा थोडा फार प्रभाव पडला आहे. व्यक्तीचा प्रभाव समीक्षणावर किती प्रभाव टाकूं शकतो, हें निदान काणेकरांच्या वाङ्मयाशीं परिचित असणाऱ्याला तरी सांगण्याची गरज नाही. 'रुपेरी वाळू' या रूपककथांच्या संग्रहाच्या निमित्ताने मराठी समीक्षकांच्या वस्तुनिष्ठ (?) दृष्टिकोणाची स्वतः काणेकरांनी केलेली टिंगल अनेकांना माहीत असेलच ! प्रस्तुतच्या ग्रंथाच्या वाचनानेहि तो सारा इतिहास कळून येईल. असो.

पुस्तकाच्या शेवटीं काणेकरांच्या साहित्यसंपदेचा उल्लेख केलेला आहे, तो काणेकर वाङ्मयाच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभ्यासकाला उपकारक वाटेल. आधुनिक मराठी साहित्यांत काणेकरांचें स्थान मोठें आहे, त्या दृष्टीने त्यांच्या वाङ्मयाचें समालोचन होणें आवश्यक होतें. प्रा. मा. का. देशपांडे, श्री. रा. अ. काळेले, डॉ. वाळिंबे इत्यादि लेखकांनी प्रा. फडके, खांडेकर, माडखोलकर, अत्रे, तांबे इत्यादि लेखकांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा परामर्श घेतला आहेच. फडके, खांडेकर, माडखोलकर आदींच्या समवेत साहित्यसावना करणाऱ्या प्रा. काणेकरांच्या वाङ्मयाचें समालोचन करणें ही म्हणूनच एक आवश्यक गोष्ट होती व ती ग्रंथाचे संपादक श्री. अविनाश केळकर यांनी उत्तम प्रकारें पार पाडली, याबद्दल त्यांचें अभिनंदन. पुस्तकावरील चित्रकार दलालांचें काणेकरांच्या व्यक्तित्वाचें दर्शन घडविणारें चित्रहि पुस्तकाच्या मौलिकतेंत भर घालणारें आहे. मात्र २०० पृष्ठांच्या या ग्रंथाचें ५ रुपये हें मूल्य अधिक वाटतें.

—व. कृ. व.

रानभूल

[लेखक—एकनाथ विश्वनाथ जोशी; प्रकाशक : वा. पु. भागवत, मौज प्रकाशन प्रायव्हेट लि, खटाववाडी मुंबई ४. पृष्ठें २२२. मूल्य ५ रुपये.]

रानभूल ही 'एका संस्थानांतील जनतेच्या दुःखाची आणि मुक्ततेची प्रक्षोभक कहाणी' होय. प्रथम 'सत्यकथा' मासिकांतून व आता स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रस्तुत कादंबरी प्रकाशित होत आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर हैदरावाद संस्थानांतील रझाकारांनी जो अमानुष अत्याचार तेथील हिंदु जनतेवर केला त्या अत्याचारांची ही गाथा त्याच संस्थानांतील एका लेखकाने लिहिली असल्याने स्वाभाविकच अत्यंत वास्तव व प्रत्ययोत्पादक अशी झालेली आहे. कादंबरीचें संपूर्ण कनायक पोखर्णी येथील एक स्वाभिमानी तरुण सूर्यकांत व त्याचा मित्र पुंडलिक या दोन पात्रांभोवतीं प्रामुख्याने गुंफलें आहे. सूर्यकांताचा भाऊ अच्युत, त्याचा एकनिष्ठ नोकर विठू, अन् सूर्यकांताची पत्नी सरस्वती, विठूची मुलगी रंगी आणि महात्मा गांधींच्या अहिंसावादाचा कृतीने पुरस्कार करणारे गुरुजी ही या सूर्यकांताची प्रभावळ. या पात्रांच्या द्वारें संस्थानी राजवटींतील हिंदु समाजाचें प्रातिनिधिक चित्रण लेखकाने केलेलें आहे. मोईनुद्दीन फकीरभाई, जानेमिया ही वरवर हिंदूंशीं मैत्री ठेवून रझाकार चळवळीस साह्य करणारी मंडळी. या मुसलमानांतहि ताहेर साहेब हा हिंदु मुसलमानांना मानवतेच्या भूमिकेवरून समान लेखूं पाहण्याचा प्रयत्न करणारा संस्थानी अधिकारी आहे. तसेच अंबादासपंत कुळकर्णी, दगडू शेट, चमन पाटील हीं मुसलमानांच्या कच्छपीं लागून हिंदूंच्या स्वाभिमानाची चाड न बाळगणारे हिंदुहि लेखकाने रंगविले आहेत. संस्थानी राजवटीचा अंतस्थ पाठिंबा असल्यामुळे उन्मत्त झालेल्या रझाकारांचा, स्वयंसेवक संघ, ऐक्य संघ, नम्र सेवक संघ आदि गोंडस नांवाखाली आपल्या अत्याचारी संघटना उभारून हिंदूंकडूनहि वेळप्रसंगीं जुलूमजबरदस्तीने या संस्थांना साह्य करण्यासाठी फंड उभारण्याच्या त्यांच्या प्रवृत्तींचा व बहुसंख्य हिंदूंच्या लाचारीचा अन् अगतिकतेचा हा इतिहास वाचतांना अनेकदा मन विषण्ण होतें. या कादंबरीत व्यक्त झालेल्या गुलामीचें जिणें साऱ्यांनाच परिचित असल्याने वाचक कादंबरींतील कथानकाशीं व 'पोखर्णीकर' मंडळीशीं सहजपणें समरस होऊन जातो.

गुरुजी या पात्राद्वारें लेखकाने गांधीजींच्या अतिरेकी तत्त्वज्ञानाच्या फोलपणाचें चित्रण केलें आहे असें वाटतें. हिंदु आणि मुसलमान हीं सारींच परमेश्वराचीं लेकरें असल्याने त्यांच्याकडे समबुद्धीने पाहिलें पाहिजे अशा विचारसरणीची ही व्यक्ति. लोककल्याण हेंच त्याचें व्रत. पण धर्मांध व द्वेष्टया रझाकारांच्या रोषाला ते बळी जातात. व्यवहारतः त्यांचें तत्त्वज्ञान अपेशी ठरतें. हिंसा ही वाईट खरी, पण मर्यादित प्रमाणांत ती आवश्यक ठरते. फार काय या कादंबरीचा नायक सूर्यकांत म्हणतो त्याप्रमाणे संस्कृतीचाहि विकास या हिंसेतून—माणसाच्या रानटीपणांतूनच झाला असेंहि दिसून येईल. (पृ. १०८) याच पृष्ठावर सूर्यकांताने गुरुजींच्या तत्त्वज्ञानाची चिकित्सा केली आहे, ती अशी : सूर्यकांत म्हणतो, "तुम्ही म्हणतां त्याग करा, अगदी अंतःकरणांत खोल पाहिलं तर माणूस चांगला असतो यावर श्रद्धा ठेवा; अशोकाचं धर्मचक्र आमचं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रतीक आहे याचा अर्थ नीट समजावून घ्या. हें झालं तुमचं. आणि ताहेरअली म्हणतो : सगळ्या जगांतल्या मंदिरांत आमच्या देवाचं मंदिर पहिलं आहे; नरनारीच्या छायेंत आम्ही वाढलों आहोंत; खंजिराप्रमाणे दिसणारा चंद्र आमचं प्रतीक आहे. मला वाद घालायचा नाही. . . . .तुम्ही यशस्वी व्हाल तेव्हा व्हाल, पण तोपर्यंत काय होणार ? एका बाजूने सत्याग्रहींची मागणी अन दुसऱ्या बाजूने शस्त्रास्त्रांची मागणी ! ती पेलणारांची आयात ! त्यांचं संघटन, त्यांचं शिक्षण ! याचा परिणाम काय होणार ?–गुरुजी, तत्त्वं शिल्लक राहतील, पण माणसं मात्र खलास होतील."

मात्र एक दोष, किंवा सैलपणा म्हणा पाहिजे तर, या कादंबरींत जाणवतो. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणांत अच्युत, त्याचा पाहुणा जनार्दन अन् गुरुजी यांचा उल्लेख इतक्या प्रमाणांत आहे की कोणालाहि प्रारंभीं या कादंबरीचा नायक अच्युतच वाटावा ! पोखर्णीसारख्या सर्वसामान्य गावांतील परिस्थिति या विशिष्ट कालांत कशी होती याच्या सूर्यकांतादि मंडळींच्या आधारें केलेल्या चित्रणासोबतच शहरांतली व संस्थानाच्या राजधानींतली परिस्थितीहि लेखकाला अच्युतच्या चित्रणाद्वारें साधायची होती असें वाटतें. व त्यासाठीच अच्युत, दत्तराव– त्यांच्या कॉलेजांतल्या निवडणुकीचें वातावरण, रव्वानी यांची निर्मिति झालेली दिसते. तरीहि अच्युत या कथानकांत प्रमुख वाटावा असें लेखकाने केलेलें चित्रण कलात्मकतेला बाधा आणणारें आहे, कादंबरीच्या एकसंधतेला विघातक आहे. जनार्दन हें पात्रहि असेंच धूमकेतूसारखें प्रगट होतें व नाहीसें होतें. केवळ एक प्रकारची गूढता कथानकांत निर्माण करण्याखेरीज या पात्राचें प्रयोजन वाटत नाही. लेखकाचा कादंबरीलेखनाचा हा पहिलाच प्रयोग आहे हें अशा कांही ठिकाणीं उघडपणें जाणवतें !

कादंबरी शोकान्त आहे. सरस्वती, सूर्यकांत, रंगी, गुरुजी ह्या साऱ्या व्यक्ति अत्याचाराला बळी पडतात. त्यांतहि सूर्यकांत, भारतीय सेनेने आक्रमकांचा पराजय करून संस्थानी प्रजेला मुक्त केल्यावर मरण पावतो व त्यामुळे एकप्रकारची खिन्नता मनांत निर्माण होते. कादंबरीची भाषा ओघवती व प्रसन्न आहे याचा वेगळा उल्लेख करण्याचें वस्तुतः प्रयोजन नाही; कारण ललितमधुर, नेमकी आणि अनलंकृत तरीहि सुंदर भाषा हें या युगाचेंच मराठी साहित्याला लाभलेलें मोलाचें देणें आहे. श्री. जोशी यांचें वेगळ्या विषयावरील राजकीय कादंबरी यशस्वीपणाने लिहिल्याबद्दल अभिनंदन. त्यांच्या भावी साहित्यसेवेची उत्कंठा लागावी एवढें सौंदर्य या 'रानभूल'मध्ये निश्चितच आहे.

'मौज' प्रकाशन असल्यामुळे पुस्तक अंतर्बाह्य सुंदर नसतें तरच आश्चर्य !

—व. कृ. व.

मेघा

(कवितासंग्रह; कवि–श्री. पुरुषोत्तम कुलकर्णी; प्रकाशक– म. रा. डांगरे, कांग्रेस नगर, नागपूर. पृष्ठें ६४; मूल्य–सव्वा रुपया.)

नागपूरच्या 'महाराष्ट्रां'तील श्री. पुरुषोत्तम कुळकर्णी यांचा पहिलाच काव्यसंग्रह गोंदिया येथील 'विदर्भ साहित्य संमेलनां'त प्रकाशित झाला. गेलीं दहा बारा वर्षें श्री. कुलकर्णी हे काव्यलेखन करीत आहेत व वेळोवेळीं विविध मराठी मासिकांतून तें प्रकाशितहि होत आहे. प्रस्तुत संग्रहांत त्यांच्या निवडक ४९ कवितांचा समावेश करण्यांत आले आहे.

श्री. कुळकर्णी यांचें काव्य वाचल्यास एक गोष्ट प्रकर्षानें जाणवते ती ही की त्यांच्या संपूर्ण कवितांवर विषण्णतेची. . .खिन्नतेची एक सावली पंख पसरून बसलेली आहे. कदाचित जगलेल्या जीवनाचाच तो एक अपरिहार्य परिणाम असेल ! कवीला जीवन जगतांना जो अनुभव आलेला आहे तो पाहिला की या विधनाला अधिक स्पष्टता येईल. 'प्रवास' या कवितेंत ते म्हणतात—

परिस्थतीच्या निवडीवरती
मढें मनाचें माझ्या बांधुनि
चौघे केव्हा चालुं लागती
व्यवहाराच्या रस्त्यावरुनी

आशा–आकांक्षांचें माझ्या
सरपण गेलें आहे पुढतीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ध्येयपूर्तिचें धरुन गाडगें
अनुभव चाले चौघांपुढती !

आणि असें प्रत्यंतर आल्यामुळेच—

'असेंच आहे इथून पुढतीं
जगावयाचें जिणें मला जर
शर्थ कशाला मग जगण्याची,
आवर काळा, आवर लौकर'

असे असहाय्यतेचे उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडतात. मनुष्य जगतो तो रमणीय भविष्यनगरींतील सुखोपभोगांची कल्पना करीत. पण भविष्यनगरीपर्यंत पोचायला गात्रांत, मनांत त्राण तर हवें ?—कवि आपल्या मनाचें वर्णन करतांना

'माझ्या मनाच्या दाराशीं
रण्‌रणे ऊन सदा' (पारवा—पृ. २८)

अशा शब्दांत करतो. अशा परिस्थितींत जगण्याचें धैर्य येणें ही अशक्यच गोष्ट आहे! —प्रयत्नच केला तर जगतां येईलहि. पण त्यासाठी 'पैसा' गाठीं हवा. कारण—

'इथे हवेला लागे पैसा, पाणी विकतें पैशावारी
पैशाची हो दुनिया ही···
पण मृत्यू मिळतो फुकटावारी !

सध्याच्या जगराहटीचें हें वर्णन यथातथ्य नाही असें कोण म्हणेल ? या वस्तुस्थितीच्या वर्णनासाठी 'आवर काळा आवर लौकर' ही कविता मुळांतूनच वाचावी ! जगाच्या निष्ठुर नीतीचा असा कटु अनुभव आल्यामुळेच की काय, रणरणत्या वाळूंत तडफडणाऱ्या अंत्यजाच्या तान्हुल्याला प्रेमाने उचलून त्याला आपल्या कमंडलूंतील पाणी पाजणाऱ्या 'कोणा एका' ची त्यांना आठवण येते ! (भर दुपार माथ्यावरती पृ. २३).

प्रतिकूल जीवनमार्गावरून चालतांना काळवंडून जाणारें कवीचें मन कधीकधी मात्र उजळून येतें तें त्याच्या 'ती'च्या सहवासस्मृतीमुळे ! या 'ती'ला उद्देशून कवीने अनेक कविता लिहिल्या आहेत व त्या विशेष रमणीय आहेत. कवीचें शब्दांवरील प्रभुत्व व शब्दयोजनाचातुर्य मात्र कवितांतून प्रकर्षाने प्रत्ययास येतें.

भावुक डोळ्यांतली तूझिया दोन पांखरें निळीं
मनास माझ्या लावुन जाती ओढ तुझी आगळी.
निळावंतिच्या निळसर लहरीपरि अंतर थरथरे
घालित वेडी साद पांखरूं माझ्या मनिचें फिरे···
(यौवनगंधा. पृ. ३७)

किंवा 'रंगुनी माझ्यासवें तूं गाइलीं गाणीं नवीं
पौर्णिमेच्या चांदरातीं धुंडिलीं क्षितिजें नवीं
मालतीच्या गुंफुनीया घातल्या माळा गळां
केतकीचा चक्रगुंफा केशपाशीं खोविला····
(रंगुनी माझ्यासवें तूं, पृ. ४१)

कवीचें शब्दचित्र रेखाटण्याचें कौशल्यहि कौतुकास्पद आहे. 'तें माझें घर' या कवितेंतील त्यांनी चितारलेलें जुनें प्रेमळ कुटुंब व कवीचें निष्पाप बालजीवन, तसेंच 'नर्तकी' या कवितेंतील नर्तकीचें नृत्य, तबलजीचें वादनकौशल्य आणि त्या कलादर्शनांत देहभान विसरलेले रसिक, साऱ्यांचेंच चित्रण मोठें हृद्य झालें आहे.

मात्र या कवितांतील अनेक कवितांत वृत्ताचा सैलपणा अधूनमधून डोकावतो. हा दोष कवीने कटाक्षाने टाळावा. एवढा दोष वगळला तर संग्रह खरोखरीच चांगला आहे. सारेच भाव प्रामाणिकपणाने शब्दांकित केल्याने उत्कट वाटतात व म्हणूनच परिणामकारक वाटतात. मेघाप्रमाणे काळवंडलेल्या कविमनाचा हा आविष्कार सरस आहे. रसिकांच्या चित्तभूमींत आनंदाचें बीज अंकुरित करण्याचें सामर्थ्य त्यांत आहे हें निःसंशय. संग्रहाला महाराष्ट्राचे, संपादक श्री. ढवळे यांची प्रस्तावना लाभली आहे.

—व. कृ. च.

साभार स्वीकार

तुकारामाचें चरित्र—कै. पु. मं. लाड
शिरवा—शांताराम
मोठे मासे आणि छोटे मासे—पु. ल. देशपांडे
पायवाट—बाबा मोहोड.
नवी पहाट—शं. बा. शास्त्री.
स्वातीचा मेघ—सी. म. बापट.
भावसरिता—वा. भ. दामले.
ज्ञानसागरांतील शिपले—गो. सी. गोखले.
सम्राट रघु—राजारामशास्त्री नाटेकर.
श्रीसमर्थ रामदास—वि. वा. हडप.
मराठी रंगभूमीचें नाट्यवैभव—शं. ना. सहस्रबुद्धे.
भाऊबंदकीचें नाट्यवैभव— " "
'संगम' (हस्तलिखित)—संपादक—प्रकाश लाम्बे.
ढवळे (मासिक)—संपादक—श्री निकेतन ढवळे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

श्री. य. गो. मालोदे
स्थानापन्न सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

१. साहित्य अकादमीकरिता प्रतिनिधींची सूचना

साहित्य अकादमीवर मराठीचे प्रतिनिधि म्हणून खालील तीन नांवें सुचविण्यांत आलीं आहेत. ह्यांपैकी एकाची निवड साहित्य अकादमी करील.

१ डॉ. शं. दा. पेंडसे, नागपूर

२ डॉ. वि. भि. कोलते, नागपूर

३ श्री. अनंत काणेकर, मुंबई.

२ अर्थ समिति

शनिवार दि. ११-५-५७ ला सायंकाळीं ६॥ वाजतां अर्थ समितीची सभा भरली होती. त्या सभेत निरनिराळ्या समित्यांच्या जमा-खर्चाचा तपशील, बाहेरील कार्यक्रमाकरिता सभागृहाचें भाडें, दीर्घकालाकरिता सभागृहाचें भाडें वगैरे विषयांचा विचार झाला.

३. परीक्षा समिति

१९५७-५८ सालाकरिता पुढीलप्रमाणे नियुक्ति करण्यांत आली आहे. संचालक : श्री. रा. पु. सगदेव, सभासद : सौ. कमलिनी पागे, सौ. उषाताई कोलते, श्री. तु. ना. काटकर, श्री. द. शं. फडके, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. या. मु. पाठक, प्रा. माणिक के. बैतुले, प्रा. पां. कृ. सावळापूरकर व श्री. तु. वि. गेडाम, संघाध्यक्ष व सरचिटणीस (पदसिद्ध).

४. आचार्य प्रबंध परीक्षा समिति

१९५८-५८ सालाकरिता पुढीलप्रमाणे नियुक्ति करण्यांत आली.

आमंत्रक : संचालक, परीक्षा समिति; सभासद : डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. या. मु. पाठक व प्रा. अ. ना. देशपांडे.

५. सांस्कृतिक कार्यक्रम समिति

आमंत्रक : श्री. द. रा. गोमकाळे, सहआमंत्रक : प्रा. माणिक के. बैतुले, सभासद : ॲड. पां. बा. गडकरी, डॉ. वि. भि. कोलते, श्री. रा. पु. सगदेव, श्री. र. वि. कुळकर्णी आणि संघाध्यक्ष व सरचिटणीस (पदसिद्ध).

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

६. कै. जांभेकर पुण्यतिथि

दि. २१-५-५७ रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां कै. बाळशास्त्री जांभेकर यांची पुण्यतिथि संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी करण्यांत आली.

७. देणगी

श्रीमती लक्ष्मीबाई गोखले यांनी वि. सा. संघास १०१ पुस्तकें देणगीदाखल दिलीं.

श्री. चंद्रभान पांडुरंगजी आचार्य, कळमना यांजकडून वि. सा. संघास रु. १० देणगीदाखल आले.

वि. सा. संघ देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

शाखावृत्त : गोंदिया

भवभूतिस्मारक

गोंदिया येथे दि. १०-५-५७ ला सायंकाळीं ६॥ वाजतां वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेतर्फे उभारण्यांत येणाऱ्या भवभूति स्मारकाची कोनशिला मुंबई राज्याचे **मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण** यांच्या हस्तें बसविण्यांत आली.

सदर समारंभास नागपूरहून मुद्दाम वि. सा. संघाचे विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर व श्री. पु. य. देशपांडे उपस्थित होते.

कोनशिलेवर प्रा. स. गो. सोमलवार यांनी तयार केलेले खालील संस्कृत श्लोक कोरलेले आहेत.

श्रीकण्ठो नाटयपाथोनिधिसितकिरणोऽग्रेसरः सत्कवीनां
विद्यानां पारदृश्वा, सहृदयहृदयाम्भोरुहाणां विवस्वान् ।
निर्माता नाटयपुष्पत्रितयमनुपमं वाङ्मयोद्यानवाटयां
देशेऽस्माकं विदर्भे, जगतिसुमहिते, लब्धजन्माऽग्रजन्मा ॥१॥

भवभूतेः कवेस्तस्य स्मारकं यच्चिकीर्षितम् ।
पटेलकुलजातेन श्रीमनोहरभाइना ॥२॥

दत्तायां भुवि, तस्येयं शिलाऽऽद्या सन्निधीयते ।
शाके रसाश्ववस्विन्दुमिते [शके १८७९] मासे तु माधवे ॥३॥

एकादश्यां सिते पक्षे मुम्बापुर्मुख्यमन्त्रिणा ।
चव्हाणकुलदीपेन यशवंतेन धीमता ॥४॥

या कार्यक्रमाकरिता उभारलेला भव्य शामियाना गोंदियांतील सुशिक्षित नागरिक स्त्री-पुरुषांनी फुलून गेला होता. मुख्य मंत्र्यांचे बरोबर श्री. मा. सा. कन्नमवार व श्री. ना. खं. तिरपुडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हे वैदर्भीय मंत्रीहि उपस्थित होते. स्वागतगीतानंतर संदेशवाचन झालें. त्या प्रसंगीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. म. वा. वि. मिराशी व डॉ. वि. भि. कोलते ह्यांचे संदेश आले होते. त्यानंतर श्री. ना. ह. तेलंग, वकील यांनी भवभूति स्मारकाची माहिती सांगितली व श्रीमान मनोहरभाई पटेल यांनी जागा दिल्याबद्दल व छोटुसाभाई क्षत्रिय यांनी ९ हजारांची देणगी जाहीर केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. इतर देणगीदारांचेहि त्यांनी आभार मानले. त्यानंतर संघाध्यक्ष श्री. ढवळे यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर मुख्य मंत्र्यांच्या हस्तें विधिपूर्वक कोनशिलेची प्रतिष्ठापना करण्यांत आली. नंतर मुख्य मंत्र्यांनी भाषण केलें. त्यांत त्यांनी सांगितलें की, भवभूति हा राष्ट्रीय कवि आहे तेव्हा त्याचें स्मारक उभारण्यांत विदर्भ साहित्य संघ औचित्य व हृदयाची विशालता दाखवीत आहे. त्या कार्याला राज्यशासन तसेंच केंद्रशासन यांचेकडून अवश्य उत्तेजन मिळेल. वंदेमातरम् होऊन हा आकर्षक समारंभ संपला.

वि. सा. संघ परीक्षा समिति वृत्त

१. केंद्राधिकाऱ्यांना सूचना

आगामी परीक्षा दि. २४, २९ ऑगस्ट ५७ रोजीं होणार आहेत. या सत्रांत प्रत्येक परीक्षेचे किती परीक्षार्थी परीक्षेला बसूं शकतील याचा अंदाज परीक्षा समितीला कळविण्याची कृपा करावी.

२. नवीन केंद्र सुरू करण्यासंबंधी सूचना

नवें केंद्र सुरू करण्याकरिता 'केंद्राधिकारी आवेदनपत्रका'ची मागणी करून त्वरित केंद्र सुरू करावें आणि अधिक प्रमाणांत परीक्षार्थी परीक्षेला बसवून परीक्षासमिति, वि. सा. संघाला सहाय्य करावें.

३. परीक्षा फल

जानेवारी ५७ मध्ये झालेल्या 'साहित्य विनीत' परीक्षेत पुढील विद्यार्थिनीचा निकाल राखून ठेवला होता; तो आता प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

परीक्षार्थी क्रमांक	नांव	श्रेणी
१९८०	कु. वनिता डोळके, नागपूर	द्वितीय श्रेणी

टीप—ऑगस्ट ५७ च्या सत्रापासून अभ्यासक्रम आणि परीक्षा शुल्क यांत झालेला बदल लक्षांत घेण्याची कृपा करावी, ही विनंती.

दि. २३।५।५७ परीक्षा समिति, वि. सा. संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

रा. पु. सगदेव
संचालक, परीक्षा समिति, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या विद्यमानें वि. सा. मंदिरांत शनिवार दिनांक १ जून १९५७ रोजीं ६।। वाजतां कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर स्मृतिदिन श्री. तात्यासाहेब भोळे यांच्या हस्तें साजरा केला गेला जाईल."

आपला नम्र

माणिक के. वैतुले

सहआमंत्रक,

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Regd. No. N 945

जाहीर विनंती

विदर्भ साहित्य संघाचें नवीन वर्ष १ एप्रिल ११५७ पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद-नोंदणी सुरू झाली आहे. वयाचीं २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी-भाषाप्रेमी व्यक्तीला सभासद होतां येतें. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरुन द्यावें लागतें. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. तीन आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यांत येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते** —एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**—पांचशें किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**—अडीचशें किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

वर्गणी येण्यास उशीर झाल्यास युगवाणीचे अंक नियमितपणें पाठविण्यांत गैरसोय होते. तरी गैरसोय टाळण्याकरिता नवीन सभासद होऊं इच्छिणारांनी व जुन्या सभासदांनी त्वरित वर्गणी पाठवावी पाठवावी अशी नम्र विनंती आहे. सभासदनोंदणीकरिता ज्यांचेजवळ अधिकृत पावतीपुस्तकें दिलीं आहेत त्या कार्यकर्त्यांचीं नांवें सोबत दिलीं आहेत. त्यांजवळ किंवा कार्यालयांत वर्गणी जमा करुन पावती घ्यावी ही विनंती आहे.

दरवर्षी वि. सा. संघाचे सभासद वाढविणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना व साहित्यप्रेमिकांना त्यांनी ह्या वर्षीहि सभासदनोंदणीला मदत करावी अशी विनंती आहे. ज्या कार्यकर्त्यांना पावतीपुस्तकें हवीं असतील त्यांनी तशी कृपया मागणी करावी.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

वि. सा. सं. चीं अधिकृत पावतीपुस्तकें ज्यांचेजवळ आहेत त्या कार्यकर्त्यांची यादी व पत्ते

अमरावती १ प्रा. मा. ल. व्यवहारे, मापर्डे बगीचा. २ श्री. कृ. व्यं. पेठकार, देवस्थळी यांचा बंगला, अंबापेठ. **हिंगणघाट** : श्री. रा. वि करपे, लक्ष्मी टॉकीजजवळ. **धामणगांव** : श्री. श्री. पुं. कटाळे. **चांदा** : श्री. ज. गो. संत, मधुवन कस्तुरबा मार्ग. **रामटेक** : श्री. कृ. पां मैराळ, श्रीराम विद्यालय. **भंडारा** : श्री. वि. वा. दावरे, जिल्हा प्रंथपाल. **किनगांवजट्ट** : श्री. वि. भ. देशपांडे, वकील. **वणी** : श्री. म. ता. राजूरकर. **खामगांव** श्री. वि. ए. नारे, गो. से महाविद्यालय. **गोंदिया** : श्री. बा. का. देशमुख, वकील, सिव्हीललाइन. **वर्धा** : श्री. र. वि. करंदीकर, वकील, महादेवपुरा. **पुसद** : १ श्री. दि. वा. जकाते, २ श्री. भा. श्री. केमकर. **यवतमाळ** श्री. दि. य. महाजन, वकील. **बुलढाणा** : श्री. मा. ग. डांगरे, वकील. **वाशीम** : श्री. कृ. भ. देशपांडे, वकील. **नागपूर** : १ श्री रा. पु. सगदेव, प्रभानिवास. जेल रोड; २ श्री. ना. हि. सोनडूले, त्रिवेदी ब्रह्मोसमाज चाळ, उत्तर बझार रोड, ३ श्री. नानासाहेब जोग, गोखले व्हिला, कांग्रेस नगर; ४ श्री. श्री. ग. पांढरीपांडे, धंतोली; ५ श्री. य. गो मालोदे, नागजीभाई टाऊन, सीतावर्डी; ६ प्रा. श्री. गो. काशीकर, सुपेकरांचें घर, धरमपेठ; ७ श्री. पां. वा. गडकरी, वॉकरगेड, सर्कल क्र. ६; ८ श्री. तु. वि. गेडाम, महारपुरा, सीतावर्डी; ९ श्री. मनोहर खोलकुटे, महाल, नागपूर.

हें मासिक श्री पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करुन संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ